Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
दोन्ही घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १८८ * * नागपूर *
मंगळवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४
पुरवणीसह पाने ८
किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## २० ठिकाणी ईडीची छापेमारी

■ **वृत्तसंस्था, रांची, दि. ११:**
विधानसभा निवडणुकीपूर्वी झारखंडमध्ये ईडीची कारवाई तीव्र झाली आहे. ईडीने सोमवारी सकाळपासून राजधानी रांची आणि चाईबासासह २० ठिकाणी छापे टाकले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, हेमंत सोरेन सरकारचे पेयजल आणि स्वच्छता विभाग मंत्री मिथिलेश ठाकूर यांचे पीएस हरेंद्र सिंह यांच्या घरावर ईडीचा छापा टाकण्यात आला.

तसेच विनय ठाकूर, मंत्र्याचा भाऊ आणि कअर मनीष रंजन यांचे निकटवर्तीय आणि अनेक अभियंत्यांच्या घरांवर छापे टाकले जात आहेत. हा छापा जल-जीवन अभियानातील अनियमिततेशी संबंधित आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी...

## इराण युद्धात उतरला

अखेर आज इस्त्राईलवर हल्ला झाला. इराणचे नेते खोमेनी यांनी सर्व मुस्लिम राष्ट्रांना सर्वांनी एक होण्याचे आवाहन केले आहे. हमासच्या हल्ल्यानंतर इस्त्राईलने लेबनानच्या सर्वोच्च नेत्याला ठार केले. नेत्यान्याहू यांना शेवटी काय हवे आहे, हे स्पष्ट आहे. चारही बाजूंनी शत्रूंनी घेराव घातलेला देश म्हणजे इस्त्राईल.या देशावर अमेरिकेची मर्जी असण्याचे कारण अमेरिकेतील अतिशय श्रीमंत असलेल्या इस्त्राईली जनतेचा सरकारवर असलेला दबाव आहे. इराणला रशियाने समर्थन घोषित केले आहे. तिकडे अमेरिकेत आणि निवडणुकीच्या तोंडावर सुरू असलेल्या युद्धात आता इस्त्राईलला मदत करणे भाग आहे. इस्त्राईलने हमास विरुद्धची मोहीम सुरू केल्यानंतर इस्त्राईलच्या अनेक शहरांवर हल्ले झाले. त्यामुळे हे युद्ध थांबण्याची शक्यता नष्ट झाली. इस्त्राईल युद्धात तरबेज असला तरी हिजबुल्लाहही कमी नाही. हिजब्बुल्लाह जवळ परिणामकारक ड्रोन हल्ले करण्याची क्षमता आहे. आता हे युद्ध किती विस्तार पावते हेच बघायचे आहे. इस्त्राईलचा इराणला युद्धात ओढण्याचा बेत सफल झालेला दिसतो. आता इराणविरुद्ध इस्त्राईलला भरगच्च पाठिंबा देणे अमेरिकेला आवश्यक झालेले आहे. तिकडे सौदी अरेबिया पासून इस्त्राईलच्या आजूबाजूच्या प्रदेशात इस्त्राईल विरुद्ध लढा पुकारण्याची परिस्थिती नाही. नेत्यान्याहू यांना अमेरिकेचा संपूर्ण पाठिंबा आहे. इस्लामिक दहशतवाद थांबवण्यासाठी इस्त्राईलने अत्यंत आक्रमक पवित्रा घेतलेला दिसतो. इराण युद्धात उतरल्यामुळे आता अमेरिका अधिक जोमाने इस्त्राईलला मदत करेल यात शंका नाही. तसेही इराणला इस्त्राईल विरुद्ध युद्ध करणे परवडणारे वाटत नाही. पण आता नेत्यान्याहू चेकाळल्याने इराणला हल्ले सुरू करणे भाग आहे. रशियाच्या पुतीन यांनी इराणला मदत करण्याचे ठरवले आहे. तरीपण न्यूक्लियर युद्धापर्यंत ही लढाई पोहोचणार नाही. असे आपण समजू. याचे मुख्य कारण म्हणजे रशिया युक्रेन बरोबर लढाईत गुंतलेला आहे. इस्त्राईलला आता लिबिया, जॉर्डन यांच्याकडून धोका नाही. पण गाझापट्टी आणि हिजबुल्लाह यांना कायमचे नष्ट केल्याशिवाय इस्त्राईल सुरक्षित होऊ शकत नाही. इराणने कितीही आव आणला असला तरीही इराणची आर्थिक परिस्थिती किंवा शक्ती तेवढी मजबूत नाही. अमेरिकेच्या निर्बंधामुळे इराणला आधीच अनेक समस्यांनी घेरलेले आहे. इराणमध्येही सगळेच आलबेल नाही. इस्त्राईल विरुद्ध इस्लामिक राष्ट्रांना एक होण्याचे केलेले आवाहन किती इस्लामिक देश गांभीयार्ने घेतात. हे सुद्धा बघावे लागेल. या युद्धामुळे अमेरिकेच्या निवडणुकीत कोणाचाही विजय झाला. तरी जिंकणाऱ्याला इस्त्राईलवर आपला वरदहस्त ठेवावाच लागेल. हे माहीत असल्याने नेत्यान्याहू यांची ताठरता वाढलेली आहे. इस्त्राईलच्या मागे अमेरिका ठामपणे उभी असल्याने हे युद्ध जास्त भडकू न देणे आणि कुठेतरी तोडगा काढणे गरजेचे आहे. आताची स्थिती याला अनुकूल नाही. एवढेच आम्ही सांगू शकतो. सध्या तरी, इस्त्राईल कुणाचेही ऐकेल असे वाटत नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

कौशल्य विद्यापीठास रतन टाटांचे नाव ■ प्रधानमंत्री आवास योजना २.० राबविणार

# मंत्रिमंडळाचे धडाकेबाज निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:**
राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागण्याची शक्यता आहे. त्याआधी आज मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. क
ौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव देण्याचा तसेच प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० राबवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. यांसह एकूण 19 धडाकेबाज निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले आहेत. आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता ही महायुती सरकारची शेवटची मंत्रिमंडळ बैठक असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सामाजिक न्याय, जलसंपदा, महसूल, नगर विकास, सहकार, वैद्यकीय शिक्षण यासह ग्राम विकास विभागांशी संबंधित निर्णय घेतले आहेत.

**: काही महत्वाचे निर्णय :**
- मुंबईत पाच प्रवेश मार्गांवर हलक्या वाहनांसाठी टोल माफ
- आगरी समाजासाठी महामंडळ
- समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम
- दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेस मान्यता
- आष्टी उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता
- वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता
- राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित
- पाचपाखाडी येथील जमीन ठाणे मनपा भवनासाठी
- खिडकाळीची जमीन हायब्रिड स्किल विद्यापीठासाठी
- राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० राबविणार
- पुणे मेट्रो रेल, रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता
- अडचणीतील उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ
- मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा
- जावळे मराठवाडा विकास मंडळासाठी अभ्यासगट
- धारावी पुनर्विकासासाठी १२५ एकर जागा
- कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव

## टोलमाफी चुनावी जुमला नाही!

### विरोधकांना शिंदेंचे प्रत्युत्तर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४:**



विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारच्या वतीने मुंबईतील प्रवेश करणाऱ्या पाच टोलनाक्यांवर हलक्या वाहनांना टोलमाफी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या टोलमाफीद्वारे मुख्यमंत्री माझा लाडका प्रवासी योजनेचा शुभारंभ केला, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. तसेच हा निर्णय निवडणुकीपुरता नसून पुढेही टोलमाफी राहणार आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.

विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकाने टोलमाफीचा निर्णय घेतला, अशी टीका विरोधकांकडून केली जात आहे. यावर बोलताना शिंदे म्हणाले, टोलमाफीचा निर्णय चुनावी जुमला नसून हा निर्णय कायम राहणार आहे. आम्ही निवडणूक डोळ्यासमोर ठेवून योजना सुरू केलेल्या नाहीत, असे शिंदे म्हणाले.

बाबा सिद्दिकी यांची हत्या करणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून फाशीची शिक्षा देण्याची विनंती करु. सिद्दिकींवर हल्ला करणाऱ्यांना सोडणार नाही. सर्वांना फासावर लटकावणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

## चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. १४:**
रामेटकमधील पेंच नदीच्या कालव्यावर फिरायला गेलेल्या आठ विद्यार्थ्यांना पोहण्याचा मोह आवरता आला नाही. ते सर्व जण कालव्यात आंघोळीसाठी उतरले. मात्र, चार विद्यार्थी वाहून गेले. त्या चारही विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला तर चार जण थोडक्यात बचावले.

ही घटना सोमवारी दुपारी रामटेकमध्ये घडली. मनदीप पाटील (१७), मयंक मेश्राम (१४), अनंत साबारे (१३) आणि मयूर बागरे (१५) अशी मृतांची नावे आहेत. विद्यार्थ्यांच्या मृतदेहांचा शोध अद्यापही सुरु आहे.

रामटेकनजीक बोरी गाव (घोटी टोक) असून येथे इंदिरा गांधी उच्च माध्यमिक शाळा आणि महाविद्यालय आहे. येथे पाचवी ते १२ वी पर्यंतची मुले शिकतात. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय आहे. त्यात जवळपास ६० मुले राहतात. सोमवारी शाळेला सुटी असल्याने विद्यार्थ्यांनी पेंच नदीच्या कालव्यावर फिरायला जाण्याचा बेत आखला. दुपारी आठही विद्यार्थी फिरायला निघाले. ४.३०वाजता कालव्यावर पोहचले. आठही जण कालव्यात उतरले.

मयंक मेश्राम, अनंत साबारे आणि मयूर बागरे यांना पोहणे येत नसतानाही ते खोल पाण्यात गेले. मनदीपने त्या तिघांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, मयूरने मनदीपचा हात पकडला. चारही मित्र वाहून जात असल्याचे बघून उर्वरित चौघे लगेच पाण्याबाहेर निघाले. त्यांनी मदतीसाठी आरडाओरड केली. मात्र, जंगल असल्यामुळे मदतीसाठी कुणीही आले नाही.

घाबरलेली चारही मुले वसतिगृहात परत आली. त्यांनी अधीक्षकांना माहिती दिली. त्यांनी लगेच रामटेकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आसाराम शेटे यांना माहिती दिली. ते ताफ्यासह कालव्यावर पोहचले. अग्निशमन दलाच्या जवानांची मदत घेतली.

गेल्या चोवीस तासात दोन वेगवेगळ्या घटनेत पाण्यात बुडून सहा मुलांचा मृत्यू झाला.

## अमेरिका, ब्रिटनच्या ३ अर्थशास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिक

■ **वृत्तसंस्था, स्टाकहोम, दि. १४:**
अमेरिका आणि ब्रिटनमधील तीन शास्त्रज्ञांना अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. विजेत्यांमध्ये तुर्की-अमेरिकन डॅरेन एसेमोग्लू, अमेरिकन सायमन जॉन्सन आणि ब्रिटन जेम्स ए. रॉबिन्सन यांचा समावेश आहे.




विविध राजकीय संस्थांची निर्मिती आणि त्याचा समाजाच्या प्रगतीवर होणारा परिणाम याविषयी केलेल्या संशोधनासाठी त्यांना हा सन्मान मिळाला आहे. या तिन्ही अर्थतज्ज्ञांनी वर्षानुवर्षे प्रगती करूनही गरीब देशांचा श्रीमंत देशांसारखा विकास कसा होऊ शकला नाही, हे सांगितले आहे.

विजेत्यांनी समाजावर राजकीय संस्थांचा प्रभाव तीन प्रकारे स्पष्ट केला आहे. त्यांच्या संशोधनाबद्दल नोबेल जाहीर झाला आहे.





भारतीय जनता पार्टी, आर्वी विधानसभा क्षेत्र
भुमिपुजन सोहळा दि. 15/10/2024 रोज मंगळवार
**वैशिष्टयपूर्ण योजनेअंतर्गत 7 कोटी 99 लक्ष रूपये**
श्री. दादाराव केचे आमदार आर्वी विधानसभा क्षेत्र यांचे शुभ हस्ते, श्री. प्रशांत सव्वालाखे माजी अध्यक्ष न.प. आर्वी तसेच माजी नगर सेवक व माजी नगर सेवीका, यांचे उपस्थित संपन्न होत आहे. तरी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे.

| अ.क्र. | कामाचे नांव | किंमत | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | LIG कॉलनी किसन केंद्रे ते भुरासिंग बडोले व चौकडे यांचे शेताच्या गेट ते कॅनल पर्यंत डांबरीकरण. | 10.00 | 09.00 |
| 2 | LIG कॉलनी गजानन कोंडलकर ते अजय भुजाडे ते कॅनल पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणा CD वर्क करणे. | 10.00 | 09.15 |
| 3 | LIG कॉलनी महादेव ठाकरे ते सुभाष राणे रस्त्याचे सिमेंटीकरण करणे. | 10.00 | 09.30 |
| 4 | तपस्या पब्लिक स्कुल जवळील संतोष अग्रवाल गोडाऊन ते कसारे ते वांगे रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 10.00 | 09.45 |
| 5 | कन्नमवार नगर प्रकाश केचे ते शीलाबाई बोंदरकर यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता. | 7.00 | 10.00 |
| 6 | कन्नमवार नगर श्री. मेंद्रे ते साई मंदिर शुक्ला रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 10.15 |
| 7 | चेरी ले-आऊट राजेश कटियारी ते शैलेश कदम भुमीगत नाली व सिमेंट रस्ता. | 15.00 | 10.30 |
| 8 | चेरी ले-आऊट श्री. माखीजा ते श्री. काकडे सर ( किटे सर) सिमेंट रस्ता. | 10.00 | 10.45 |
| 9 | चेरी ले-आऊट येथे न.प. हद्द ते सतिश शिरभाते रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 20.00 | 11.00 |
| 10 | बालाजी नगर रामटेके ते दिलीप मेहकरे ते प्रमोद वानखेडे सिमेंट रस्ता व नाली. | 9.00 | 11.15 |
| 11 | बालाजी नगर (दाऊतनगर) सर्व्हे क्र. 74 येथील ओपन स्पेसचे लादीकरण व ओपन जिम साहित्य. | 15.00 | 11.30 |
| 12 | आर्वी-तळेगांव रोड पासुन ते सहकार मंगल कार्यालया पर्यंतचा रस्ता. | 10.00 | 11.45 |
| 13 | वसंत नगर येथे बानुबाकोडे ते तळणीकर यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता. | 15.00 | 12.00 |
| 14 | आसोले नगर येथे श्री. राजेश सोळंके घरा समोरील हनुमान मंदिराचे बांधकाम व लादीकरण करणे. | 10.00 | 12.15 |
| 15 | आसोले नगर विनायक भाकरे यांचे घराजवळील शिव मंदिर सभागृह बांधकाम करणे. | 15.00 | 12.30 |
| 16 | आसोले नगर येथे राजगुरे सर ते निंभाळकर यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता. | 10.00 | 12.45 |
| 17 | आसोले नगर खुशाल खोब्रागडे ते साहेबराव चौधरी सिमेंट रस्ता. | 10.00 | 01.00 |
| 18 | आर्वी तायडे ले-आऊट गजानन महाराज मंदिर सभागृहाचे बांधकाम करणे. | 25.00 | 01.15 |
| 19 | साई नगर खरपे ले-आऊट प्रा. विजय देशमुख यांचे घरासमोरील बगीच्याचे बांधकाम करणे. | 20.00 | 01.30 |
| 20 | साई नगर दिनदयाल उपाध्याय बगीच्याचे बांधकाम करणे. | 15.00 | 01.45 |
| 21 | साई नगर संजय गुल्हाने ते दिलीपसिंग गुरूनासिंगानी सिमेंट रस्ता. | 15.00 | 02.00 |
| 22 | साई नगर धनंजय चौबे व श्री. उज्जनकर यांचे घरासमोरील ओपन प्लेस मध्ये पेव्हिंग बलॉक बसविणे. | 10.00 | 02.15 |
| 23 | साई नगर येथे धर्माळे ते अंबरकर यांचे घरापर्यंत भुमीगत नाली. | 10.00 | 02.30 |
| 24 | साई नगर येथे अतुल वानखेडे ते जगदिश हजारे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता. | 10.00 | 02.45 |
| 25 | ड्रिमलँड सिटी येथे हरे माधव समाज भवन सभागृहाचे बांधकाम करणे. | 31.00 | 03.00 |
| 26 | राधाकृष्ण नगर गंगाधर काळे ते गोकुल धाम ले-आऊट पर्यंत व शिवराम लाडके ते चांडक सिमेंट रस्ता. | 17.00 | 03.15 |
| 27 | राधाकृष्ण नगर सादाणी ते खोंडे ते उमेश राठी ते कन्नु गांधी भुमीगत नाली. | 7.00 | 03.30 |
| 28 | जाजुवाडी येथे कोर्टापासुन ते बेद ले-आऊट पर्यंत दोन्ही बाजुने पेव्हर ब्लॉक लावणे. | 20.00 | 03.45 |
| 29 | स्टेशन वार्ड पटेल शॉ मिल जवळील हनुमान मंदिर परिसरात सभागृह. | 15.00 | 04.00 |
| 30 | स्टेशन वार्ड श्री. श्यामबाबा मंदिर परिसरात सभागृहाचे बांधकाम करणे. | 60.00 | 04.15 |
| 31 | गौरक्षण वार्ड अशोक थोरात यांचे दुकान ते मारोतराव चिडले ते अभय पांडे सिमेंट रस्ता. | 15.00 | 04.30 |
| 32 | खडकपुरा वार्ड आचार्य गुरूवर संत शिरोमणी विद्यासागर संत भवन सभागृह. | 31.00 | 04.45 |
| 33 | बालाजी वार्ड पिंजारपुरा येथे हजरत बदरूद्दीन जिन्दा शहा मदार दर्ग्याचे नुतणीकरण करणे. | 15.00 | 05.00 |
| 34 | बालाजी वार्ड येथे डोंगरे यांचे घरासमोरील परिसराचे बांधकाम करणे. | 10.00 | 05.15 |
| 35 | बालाजी वार्ड संत गोरोबा काका मंदिर व तात्याजी महाराज मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण करणे. | 20.00 | 05.30 |
| 36 | लोकमान्य वार्ड येथील बोहरा मंजिद येथे सौर उर्जा पॅनल बसविणे. | 15.00 | 05.45 |
| 37 | लोकमान्य वार्ड येथील महादेव मंदिर सभागृहाचे बांधकाम करणे. | 25.00 | 06.00 |
| 38 | गांधी चौक जयस्तंभ चौकाचे बांधकाम करणे. | 20.00 | 06.15 |
| 39 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वार्ड अविनाश पंचगडे ते श्री. गाडेकर सिमेंट रस्ता. | 12.00 | 06.30 |
| 40 | नेताजी वार्ड अंबादास कावरे ते ज्ञानेश्वर लाडके,गणेश सहारे ते मुटकुरे,रवि अजमिरे ते उत्तम लाडके नाली. | 12.00 | 06.45 |
| 41 | विठ्ठल वार्ड येथे सरदार बेडा समोरील परिसरातील बांधकाम करणे. | 10.00 | 07.00 |
| 42 | विठ्ठल वार्ड योगेश निखाडे ते सुभाष गभणे सिमेंट रस्ता व नाली. | 15.00 | 07.15 |
| 43 | आंबेडकर वार्ड श्री. हनुमान मंदिर परिसराचे बांधकाम व लादीकरण करणे. (पवन पडोळे यांचे घराजवळ) | 20.00 | 07.30 |
| 44 | जनता नगर येथे अशोक पांडव ते तलाव रोड पर्यंत सिमेंट रस्ता. | 10.00 | 07.45 |
| 45 | जनता नगर येथे केशव उराडे ते मिश्रा यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता. | 5.00 | 08.00 |
| 46 | अवघड वार्ड सुभाष वऱ्हेकर ते गुरूनानक,सतीश वऱ्हेकर ते कुंभारे ते महेश मते ते शंकर गवळी नाली. | 25.00 | 08.15 |
| 47 | रामदेवबाबा वार्ड येथे गणपती मंदिर परिसराचे लादीकरण बसविणे. | 7.00 | 08.30 |
| 48 | महाराणा प्रताप वार्ड जुना उल्हापुर नाक्याजवळील बौध्द विहाराचे बांधकाम. | 15.00 | 08.45 |
| 49 | उत्तम नगर गुलाबसिंग चितोडीया ते विनोदसिंग ते उत्तमसिंग चितोडीया मोठ्या नाल्यापर्यंत भुमीगत नाली. | 10.00 | 09.00 |
| 50 | माळगण वार्ड मनिकराव वऱ्हाडे ते सुनिल मुळतकर व शालीकराम लोखंडे ते अनिल शेंद्रे भुमीगत नाली. | 15.00 | 09.15 |
| 51 | मायबाई वार्ड संदिप पोकळे ते किशोर माळोदे यांचे घराकडे जाणाऱ्या नालीचे भुमीगत नाली. | 10.00 | 09.30 |
| 52 | न.प. आर्वी स्टेशन वार्ड भगवती ले-आऊट येथे भिमा भोई सभागृहाचे बांधकाम करणे. | 31.00 | 09.45 |

विनीत :- राहुल गोडबोले, अध्यक्ष भाजपा आर्वी शहर

## १० लाखांचे बक्षीस असलेल्या नक्षल दाम्पत्याचे आत्मसमर्पण

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १४:**
दहा लाखांचे बक्षीस असलेल्या नक्षल दाम्पत्याने गडचिरोली पोलिसांसमोर सोमवारीआत्मसमर्पण केले. नक्षल चळवळीत वैवाहिक आयुष्य जगता येत नसल्याने त्यांनी आत्मसमर्पण केले. अनेक हिंसक कारवायांत सक्रिय सहभाग असलेल्या या दाम्पत्याच्या शरणागतीने नक्षल्यांना मोठा हादरा बसला आहे.

वरुण राजा मुचाकी ऊर्फ उंगा ऊर्फ मनीराम ऊर्फ रेंगु (२७, रा. पिडमिली, ता. चिंतागुफा, जि. सुकमा (छत्तीसगड) व त्याची पत्नी रोशनी विज्या वाचामी(२४ , रा. मल्लमपोड्डूर, ता. भामरागड) असे या जहाल माओवादी दाम्पत्याचे नाव आहे. वरुण हा भामरागड



दलममध्ये कमांडर पदावर तर रोशनी ही याच दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. त्याने कार्यकाळात १५ गुन्हे केले असून यात १० चकमकीसह इतर ५ गुन्ह्यांचा समावेश आहे. रोशनी वाचामी हिच्यावरही अनेक गुन्हे दाखल आहेत.

## अतुल परचुरे यांचे निधन

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४:**
मराठी रंगभूमी तसेच चित्रपट सृष्टीतील अभिनेते अतुल परचुरे यांचे ५७ व्या वर्षी निधन झाले.



त्यांना कॅन्सरचे निदान झाले होते. मात्र या संपूर्ण आजारामधून ते सुखरुप बाहेर पडले होते. पुन्हा त्यांनी अभिनयक्षेत्रात दमदार कमबॅक केलं. कामाला नव्याने सुरुवात करत असताना त्यांच्यावर उपचारही सुरु होते. आज १४ ऑक्टोबर रोजी त्यांचे निधन झाले.

आजवर अतुल यांनी त्यांच्या अभिनयाने लाखो प्रेक्षकांची मने जिंकली. मात्र मधल्या काही काळात अतुल यांना गंभीर आजाराचा सामना करावा लागला. आजारपणाशी लढा देत त्यांनी प्रवास सुरू ठेवला होता.

### रस्त्याने पळवून-पळवून मारले, तिघांना अटक

## पैशांच्या वादातून तरुणाची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४:**
उधारीचे पैसे मागण्यासाठी गेलेल्या तरुण व त्याच्या मित्रांवर एका कुटुंबाने हल्ला केला. मित्र पळून जाण्यात यशस्वी झाले, मात्र तरुणाला रस्त्याने पळवून पळवून कोयत्याने वार करीत हत्या करण्यात आली. ही घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत रविवारी रात्री घडली.

पोलिसांनी नंदकुमार सीयाराम चकोले (४९), त्याची पत्नी आणि मुलगा करण चकोले (२१) या तिघांना अटक केली आहे . दोन अल्पवयीनही पोलिसांच्या ताब्यात आहेत.

ताहिर उर्फ बाबा जाकीर खान (२२) रा. गुलशननगर असे मृताचे नाव आहे. या हल्ल्यात ताहिरचे मित्र ईश्वर केशव निशाद (२१) रा. वैष्णव देवीनगर आणि दीपक बिहारीलाल मिसरीया (२५) रा. यशोधरानगर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

माहितीनुसार, ताहिरने काही दिवसांपूर्वी नंदकुमारचा मुलगा अर्जुन याला २० हजार रुपये उसणे दिले होते. रविवारी रात्री ईश्वर कोराडी मंदिरात जाण्याच्या तयारीत असताना ताहिरने त्याला फोन करून मी सोबत मंदिरात येतो असे सांगितले. तत्पूर्वी अर्जुनने त्याला फोन करून पैसे घेण्यासाठी विजयनगर परिसरात बोलावले होते. ताहिरने ईश्वर आणि दीपक यांनाही सोबत येण्यास म्हटले. तिघेही विजयनगर परिसरात पोहोचले असता अर्जुनने त्यांना एनआयटी उद्यानाजवळ चलण्यास म्हटले. तेथे अर्जुन आणि ताहिर यांच्यात वाद झाला.

अचानक अर्जुनचे वडील नंदकुमार, भाऊ करण, आई आणि अल्पवयीन चुलत भाऊ काठी आणि कोयता घेऊन तेथे आले. पाचही जणांनी मिळून तिघांवरही हल्ला केला. ईश्वर आणि दीपकने पळ काढला, मात्र ताहिर आरोपींच्या तावडीत सापडला होता. पाचही आरोपींनी त्याला बेदम मारहाण करीत रस्त्याने पळवून पळवून कोयता, काठी आणि दगडाने वार करीत खून केला.

ईश्वरने ताहिरचा भाऊ समीर याला घटनेची माहिती दिली. सर्व विजयनगर परिसरात पोहोचले. मात्र ना तेथे ताहिर होता आणि ना आरोपी. संपूर्ण परिसर पिंजून काढल्यानंतर ताहिर गुलमोहरनगरात रस्त्यावर जखमी अवस्थेत पडून असल्याचे आढळला. त्याला तत्काळ उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोमवारी सकाळी ताहिरचा मृत्यू झाला. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तीन आरोपींना अटक केली.

## भाजप १५० ते १६० जागा लढवणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:**
महाराष्ट्रात निवडणूकीच सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी सुरू झाली आहे. यात भाजपच्या उमेदवारांची यादी जवळपास फायनल झाली आहे. राज्यात भाजप १५० ते १६० जागा लढवणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

माहितीनुसार भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांसोबत झालेल्या बैठकीत उमेदवारांचे नावं निश्चित करण्यात आले आहेत. या यादीवर भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वासह चर्चा होणार आहे. यासाठी फडणीस आणि भाजपचे इतर प्रमुख नेते दिल्लीला रवाना झाले आहेत.

महाराष्ट्रातील उमेदवारांची यादी जाहीर करण्यापूर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, राज्याचे निवडणूक प्रभारी भूपेंद्र यादव आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दिल्लीला गेले . पक्षाच्या हायकमांडसमोर उमेदवारांचे संपूर्ण सादरीकरण केल्यानंतर भाजपची पहिली यादी जवळपास अंतिम होण्याची शक्यता आहे.



महायुतीमध्ये जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे. भाजप १६० जागा लढवणार आहे. उरलेल्या १२८ पैकी शिंदे सेनेला ८० जागा तर राष्ट्रवादी दादा गटाला ४८ जागा जवळपास निश्चित मानल्या जात आहेत. यातून तिन्ही पक्षांना मित्रपक्षांना काही जागा सोडायच्या आहेत, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

# जव्हारमध्ये धम्म चक्र प्रवर्तक दिन साजरा

**जव्हार, दि. १४ : प्रतिनिधी**

जव्हार शहरात बौद्ध उपासक व उपासिकांच्या माध्यमातून 68 व्या धम्म चक्र प्रवर्तन दिनाचे आयोजन शनिवारी सकाळी 11 ते दुपारी 2 वाजेपर्यंत भारतीय बौद्ध महासभा जव्हार शाखेच्या वतीने करण्यात आले होते.भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे मोठया प्रमाणात अनुयायांनी उपस्थिती दर्शवित आंबेडकरांना अभिवादन करत, धार्मिक पूजा विधी करत कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.



शहरातील नालंदा बौद्ध विहार येथे त्रीसरण, पंचशील ग्रहण करीत , भीम स्मरण व भीम स्तुती अशी प्रार्थना घेण्यात आली.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व प्रवचन कार म्हणून प्रा.आर.आर.कसबे, पोलीस निरीक्षक किशोर मानभाव तर पालघर जिल्हा भारतीय बौद्ध महासभा कडून "अनाथ पिंडक" भालचंद्र गायकवाड मोखाडा तालुका सरचिटणीस दिलीप पालवे यांनी प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.या वेळी वर्षावास यशस्वीरित्या पूर्ण केले म्हणून केदार दाम्पत्याचा सत्कार करण्यात आला, शिवाय वर्षावास कालखंडात ज्यांनी विषय मांडली केली त्यांचा देखील सन्मान आयोजकांच्या वतीने करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भारतीय बौद्ध महासभा जव्हार तालुका अध्यक्ष उत्तम शेवाळे, निमंत्रक सागर बल्लाळ, गोविंद बल्लाळ, रमेश केदार, दिनकर तपासे, अमोल बर्वे, माजी नगर सेविका तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

14 ऑक्टोबर 1965 साली लक्षावधी अनुयांयासह स्वीकारलेल्या बुद्ध धम्मामुळे समाजात एक आत्मभान आले.त्यांची आस्मिता जागी झाली व माणूसपणाची जाणीवही निर्माण झाली. जातीव्यवस्थेचा बळी ठरलेला इतर जाती-वर्ग धम्माकडे वळू लागला. पण धम्म स्वीकारून आता 67 वर्षे झालेली असताना सुद्धा बौद्ध समाजाचे आचरण बुद्धमय झाले आहे,असे म्हणता येत नाही.या करिता, धम्म परिषदांनी बौद्ध समाजाचे आचरण बुद्धमय करण्याची ऐतिहासिक जबाबदारी पार पाडली पाहिजे. धम्मात शिरलेल्या अनुचित गोष्टींचे निर्मूलन करण्यासाठी धम्म परिषदा असाव्यात. धम्म परिषदा या विचार संमेलन व कार्यशाळेच्या प्रतिक ठराव्यात. धम्म परिषदांत केवळ पाठ केलेल्या गाथा म्हटल्या जाऊ नयेत, तर बुद्धाचे समाजशास्त्र,अर्थशास्त्र, इहवाद, बुद्धीवाद क्रांतीकारी राजकारण,विज्ञानवाद, प्रतीत्यसमुत्पाद, लोकशाही,श्रमणसंस्कृती, बावीस प्रतिज्ञा, बुद्ध आणि भारताचे संविधान अशा विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जावीत,असे मार्गदर्शन पर कसबे यांनी सांगितले .या वेळी असंख्य आंबेडकर अनुयायी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसंत धांडे सर यांनी केले.

# नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध नागरी सुविधा आणि प्रकल्पांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते लोकार्पण व भूमिपूजन

**नवी मुंबई, दि. १४ : प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या विकासाला गती देणारे चांगले काम नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून होत असून आज 25 नागरी सुविधांचे व प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन होत आहे याबद्दल समाधान व्यक्त करीत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री. एकनाथ शिंदे यांनी यामध्ये ऑलिंपिक आकाराचा तरणतलाव, महिलांसाठी कॅन्सर तपासणी सुविधा, 10 बेडचा केमोथेरपी वॉर्ड, शाळा, मार्केट, आरोग्य केंद्र, जलकुंभ, ई-बसेस, ई-चार्जिंग अशा 410 कोटीहून अधिक रक्कमेच्या विविध प्रकारच्या सुविधांचा समावेश असल्याचे सांगितले. पाण्यावर पुनर्प्रक्रिया केली जाते, आता महानगरपालिका कापडावर पुनर्प्रक्रिया करणार आहे, अशा वेगळया प्रकारच्या आधुनिक प्रकल्पाचा लोकांना फायदा होईल असेही ते म्हणाले.

नवी मुंबई महानगरपालिका आणि सिडको यांच्या वतीने वाशी येथील सिडको प्रदर्शनी केंद्रात विविध नागरी सुविधा, प्रकल्प यांचा लोकार्पण व भूमिपूजन समारंभ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी सिडकोचे




अध्यक्ष श्री.संजय शिरसाट, खासदार श्री. श्रीरंग बारणे, खासदार श्री.नरेश म्हस्के, आमदार श्री.गणेश नाईक, आमदार श्री. निरंजन डावखरे, आमदार श्रीम.मंदा म्हात्रे, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकिय संचालक श्री. विजय सिंघल, नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे, केंद्रीय वस्त्र मंत्रालयाच्या वस्त्र समितीच्या आयुक्त तथा उपाध्यक्ष श्रीम. रुप राशी व इतर मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मुख्यमंत्री महोदयांनी माझी लाडकी बहीण योजनेत नवी मुंबईतील 1 लाख 45 हजारहून अधिक महिलांना प्रत्यक्ष लाभ मिळाला असून नवी मुंबईत चांगले काम झाल्याचा अभिप्राय दिला. यावेळी महानगरपालिका क्षेत्रातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना यांचे लाभार्थी यांना प्रातिनिधिक स्वरुपात योजनेचा लाभ देण्यात आला तसेच संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम अंतर्गत परिसर सखी वस्ती संघामधील 10 महिला वाहन चालकांना इलेक्ट्रिक वाहनाची चावी मुख्यमंत्री महोदयांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आली.

त्याचप्रमाणे नमुंमपा परिवहन उपक्रमाच्या एनएमएमटी बसेसमधून महिलांना तिकीट दरात 50% म्हणजे हाफ तिकीटात प्रवास करता येईल अशी घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी करताच कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित महिलांनी टाळ्यांचा गजर केला.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांना मागील वर्षी दिवाळीला 30 हजार सानुग्रह अनुदान मिळाले होते यावर्षी त्यामध्ये 3 हजाराची भरीव वाढ करीत 33 हजार सानुग्रह अनुदान देण्यात येईल असेही मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले.

# आदिवासी नेते काळूराम काका यांचे निधन

**मनोर, दि. १४ : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे, जल जंगल जमिनीवर आदिवासी, भूमिपुत्र शेतकऱ्यांचे अधिकारासाठी लढणारे, भूमी सेना आदिवासी एकता परिषदचे संस्थापक काळूराम धोदडे यांचे गुरुवारी रात्री उशिरा मुंबईतीलसेव्हन हिल्स हॉस्पिटल येथे निधन झाले. ते 89 वर्षांचे होते. शुक्रवारी मनोर दामखिंड येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चाताप पत्नी, एक मुलगी, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे.

त्यांच्या अंत्यदर्शनासाठी आदिवासी एकता परिषद महासचिव अशोक चौधरी,जिल्हाधिकारी गोविंद बोडके, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, माजी आमदार विवेक पंडित, माजी आमदार हुसेन दलवाई, आ. सुनील भुसारा, आ. राजेश पाटील, आ. वनगा, माजी खासदार राजेंद्र गावीत, बळीराम जाधव, पांडुरंग बेलकर, संतोष जनाठे, विराज गडग, अशोक बागुल, वैदेही वाढाण, ब्रयन लोबो, डोंगर बाबू बागुल, समीर वर्तक, जयेंद्र दुबळा, कुंदन संखे, जेष्ठ पत्रकार प्रताप आसबे, भरत राजपूत, अमित घोडा, मीना धोदडे, निता काटकर, शशी सोनवणे, दत्ता करबट यासह गडचिरोली, नाशिक, जळगाव, मुंबई, ठाणे, दादरा नगर हवेली, गुजरात यासह अनेक भागातून सामाजिक कार्यकर्ते भूमिसेना, आदिवासी एकता परिषदेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



औद्योगिकरण व नागरीकरणाचे परिणाम या भागात दिसू लागले होते. याचा पहिला बळी अर्थातच आदिवासी ठरत असल्याचे त्यांना दिसू लागले. धरणे, महामार्ग अशा विविध प्रकल्पांसाठी आदिवासींच्या जमिनी संपादित केल्या जाऊ लागल्या. धरणे बांधली पण या धरणाचे पाणी थेट मुंबई, वसई, भाईदरला आणि आदिवासी मात्र पाण्यापासून वंचित. भूसंपादन तर झाले पण ना योग्य मोबदला ना योग्य पुनर्वसन. जंगलाचा मालक जंगलातूनच बेदखल होऊ लागला. आदिवासींच्या हातातून येथील जल, जंगल, जमीन आदी नैसर्गिक संसाधने हिसकावून घेतली जात आहेत. अलीकडील महामार्ग, बुलेट ट्रेन, वाढवणं बंदर अशा विविध प्रकल्पांनी तर त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधनच नष्ट होत असल्याने धोदडे यांनी शेवटच्या श्वासापर्यंत लढा दिला.

पालघर तालुक्यातील मनोर जवळील कोंढाण गावात १९३६ साली धोदडे यांचा जन्म झाला. आई-वडिलांनी पुढे त्यांना आश्रमशाळेत पाठवले. आश्रमशाळेतच ते अकरावीपर्यंत शिकले. खरंतर इथून पुढे नोकरी करून ते स्थिरावला असते. पण शालेय जीवनापासूनच बंडखोर असलेल्या काळुराम यांनी आश्रमशाळेत आणि आपल्या गावात अवती-भवती जे पाहिले, त्या सामाजिक वास्तवाने त्यांना स्वस्थ बसू दिले नाही. त्यांनी अकरावीनंतर जंगल कामगार सोसायटीमध्ये नोकरी स्वीकारली. पण, आदिवासींच्या उत्थानासाठी चालवण्यात येणाऱ्या या संस्थेमध्येही वेगळें काही घडत नाही हे पाहून तर त्यांच्या बंडखोर वृत्तीने अधिकच उचल खाल्ली. आदिवासींना त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार संबंधात वैयक्तिक अर्ज लिहून देण्याचं काम करताना त्यांनी आपल्यातील या वृत्तीला शालेय जीवनातच सक्रिय केलं होतं. आश्रमशाळेत शिकत असताना त्यांनी आश्रमशाळेतील गैव्यवहार चव्हाट्यावर आणण्याचे काम केले.

# महायुतीच्या माध्यमातून शहापूरची विकसित शहराकडे वाटचाल - कपिल पाटील



**शहापूर, दि. १४ : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार व राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून शहापूर शहराची विकसित शहराकडे वाटचाल सुरू आहे. शहापूरात नागरी सुविधांसाठी विविध कामे सुरू असून, भविष्यात एक सुनियोजित शहर म्हणून शहापूरचा नावलौकिक होईल, असा विश्वास माजी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी येथे शुक्रवारी व्यक्त केला.

माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या प्रयत्नांतून राज्य सरकारच्या नगरोत्थान योजनेतून शहापूरमध्ये सुमारे साडेआठ कोटींहून अधिक रुपयांची विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत. नगरपंचायतीच्या प्रभाग क्र. ७ मधील जलकुंभ व जलशुद्धीकरण केंद्र, प्रभाग क्र. ११ मधील नगरपंचायत कार्यालयासमोर उद्यान, तहसील व पोलिस ठाण्याच्या आवारात हायमास्ट व स्वच्छतागृह, सोनार आळी येथे कॉंक्रिट रस्ता, भेंडी आळी येथे कॉंक्रिट रस्ता, प्रभाग क्र. १४ मधील डोंबिवली नागरी बँकेनजीक ओपन स्पेस वॉल कंपाऊंड बांधणे, जुना आग्रा रोड केणे आळी ते भारंगी नदीपर्यंत गटारांचे कॉंक्रिटीकरण, हायमास्ट बसविणे आदी कामांचे कपिल पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी भाजपाचे शहापूर विधानसभा प्रमुख अशोक इरनक, तालुकाध्यक्ष भास्कर जाधव, नगराध्यक्षा गायत्री भांगरे, उपनगराध्यक्ष विजय भगत, भाजपाचे तालुकाध्यक्ष विवेक नार्वेकर, नगरसेविका मिताली भोपतराव, योगेश महाजन, विनोद कदम, कामिनी सावंत, माजी नगरसेविका वैदेही नार्वेकर आदींसह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शहापूर येथील पाणीपुरवठा योजनेच्या जलकुंभासाठी गायकवाड कुटुंबाने दानपत्रान्वये नगरपंचायतीला जमीन दिल्याबद्दल गायकवाड कुटुंबियांचे कपिल पाटील यांनी आभार मानले. तसेच या जलकुंभामुळे शहरातील नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होईल, याबद्दल आनंद व्यक्त केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून शहापूरच्या विकासासाठी आणखी भरीव निधी मिळेल, असा विश्वासही कपिल पाटील यांनी व्यक्त केला.

# धावत्या रिक्षात प्रवाशी बसवण्याच्या वादातून रिक्षा चालकाची हत्या आरोपी रिक्षा चालकास अटक

**भिवंडी, दि.१४ : प्रतिनिधी**

दोन रिक्षा चालकांमध्ये धावत्या रिक्षात प्रवाशी बसवण्यावरून झालेल्या जुन्या वादाच्या रागातून एका रिक्षा चालकाने दुसऱ्या रिक्षा चालकाची धारदार शस्त्राने गळा चिरून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सायंकाळी भिवंडीतून समोर आली आहे.ही घटना रांजनोली नाका परिसरातील पाईप लाईन रोडवर घडली आहे.याप्रकरणी हत्याऱ्या रिक्षा चालकाच्या विरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यास अटक केली आहे.दिनेश गणपत भोईर (४५ रा. पिंपळास) असे हत्या झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे.तर आजम इस्माईल शेख (३५ रा.कल्याण पश्चिम) असे हत्याऱ्या रिक्षा चालकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आरोपी रिक्षा चालक आजम आणि मयत रिक्षा चालक दिनेश यांच्यात १० ऑक्टोबर पूर्वी मानकोली नाक्यावर धावत्या रिक्षात प्रवाशी घेण्यावरून वाद झाला होता. दरम्यान हा वाद १० ऑक्टोबर रोजी उफाळून आल्याने या रागातून आजमने दिनेशला रांजनोली नाका परिसरातील पाईप लाईन रोडवर गाठून धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले होते.दरम्यान दीनेशला उपचारासाठी येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे.याप्रकरणी कोनगाव पोलिस ठाण्यात अज्ञाताच्या विरोधात मयत दिनेशचा मुलगा अजित भोईर याच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.तर सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,पोलिस गुन्ह्याचा तपास करत असतानाच ११ ऑक्टोबर रोजी आरोपी आजमने कोनगाव पोलिस ठाण्यात हजर होत खुनाची कबुली दिल्याने पोलिसांनी आजमला ताब्यात घेऊन अटक केली आहे.पुढील तपास वपोनि नेताराम मस्के करीत आहेत.

# पतीकडून पत्नीची भररस्त्यात गळा चिरुन हत्या

**भाईंदर, दि. १४ : प्रतिनिधी**

मिरारोडच्या नयानगर एन.एच. शाळेजवळ न्यायालयाच्या आदेशानुसार मुलांचा ताबा घेण्याच्या प्रकरणावरून राग विकोपाला जात पतीने पत्नीची गळा चिरडून हत्या केल्याची घटना आहे. हत्येनंतर आरोपीने पोलिसांकडे आत्मसमर्पण केले. महिलेचे नाव अमरीन खान (वय ३६ वर्ष) आहे.

अमरीन खान बांद्रा येथील राहणारी रहिवाशी आहे. गेल्या दीड वर्षांपासून तिचे मिरारोड येथे राहणाऱ्या पती नदीम खान सोबत कौटुंबिक वाद सुरु होते. आपल्या दोन मुलांचा ताबा घेण्यासाठी न्यायालयात वाद सुरू होता. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात न्यायालयाने आदेश दोन्ही मुलांचा ताबा हा आईला द्यावा, असे आदेश दिले. मात्र तरीही पतींकडून ताबा मिळत नव्हता. पुन्हा न्यायालयात जाऊन त्या महिलेनी दाद मागितली तेंव्हा पोलीस संरक्षणात १२ वर्षांची मुलगी व २ वर्षांचा मुलगा यांना ताब्यात घेण्यात आदेश दिले होते. त्यानुसार मीरा भाईंदरचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या आदेशानुसार एक महिला व एक पुरुष असे दोन कर्मचारी दिले होते. त्यासाठी नया नगर पोलीस ठाण्यात सात हजार रुपये भरले होते.

अमरीन मुलांना भेटण्यासाठी नवऱ्याच्या घरी गेले तेंव्हा मुले नाहीत, ती आपल्या आजीसोबत राजस्थान येथील अजमेर दर्गा येथे गेल्याचे सांगण्यात आले. मात्र, मुलगा आणि मुलगी घरीच असल्याचा संशय आल्याने अमरीन दुसऱ्या दिवशी एन.एच. शाळेत गेल्या होत्या. ही माहिती मिळताच पती नदीम खान (४१) याने रस्त्यात गाठून तिच्यावर चाकून गळ्यावर सपासप वार केले. याहल्यात तिचा जागीच मृत्यू झाला. हत्या केल्यानंतर नदीम खानने पोलिसांपुढे समर्पण केले.

# सकाळी 7: 29 रेल्वे डब्यात साई मंडळाच्या भजनाने दुमदुमली अवघी डोंबिवली नगरी



**डोंबिवली, दि. १४ : प्रतिनिधी**

विजयादशमीच्या निमित्ताने दरवर्षी आपापल्या रेल्वेच्या डब्यात विजयदशमी हा सण जोरदार पद्धतीने साजरा केला जातो. यंदाही साई भजन मंडळ ( डोंबिवली - दिवा ) यांनी अति उत्साहीत आणि जल्लोषात साजरा केला. यावेळी वारकरी परंपरा जपत या मंडळाचे अध्यक्ष श्री.अंकुश बोरगे बुआ यांनी एक देश, एक गणवेष असे दाखवून दिले. श्री. प्रदीप कदम बुआ यांनी आपल्या मध्य, पश्चिम, हार्बर या तिन्ही मार्गाचे सर्व भजन मंडळ कमिटीचे अध्यक्ष श्री. हनुमंत तावडे महाराज यांचा शाल व श्रीफळ देऊन मानाने सत्कार केला. यांचवेळी साप्ताहिक प्रकट महाराष्ट्र युट्युब चॅनेल आणि डिजिटल मीडियाचे डोंबिवली प्रतिनिधी श्री. दिनेश हुमणे यांचाही सत्कार करण्यात आला.

भजन मंडळाचे उपाध्यक्ष श्री. प्रदीप कदम यांनी भजनाच्या तालावर सर्वांना मंत्रमुग्ध करून भजन परिसर दुमदुमून टाकले. प्रत्येकाचे पाय या गाडीकडे आकर्षण करीत होते. गाडी पूर्णपणे हार, फुगे, पताके, लावून पारंपारिक पद्धतीने सजविली जाते. नारळ वाढवून गाडीची आणि देवींची पूजा, आरती केली जाते. हा रोजचा येण्याजाण्याचा प्रवास सुखकर व्हावा याचा गाऱ्हाणं घालण्यात सर्व भजन मंडळ, आणि प्रवासी हातभार लावत असतात. यावेळी प्रदीप कदम, अंकुश बोरगे, विकास हळदवणेकर, उमेश घरवे, राकेश गायकवाड, प्रविण मेढेकर, विजय वर्दम, अशोक शिंदे, सचिन बेलकर, विनय विचारे, विजय बेलकर, दिपक कांबळे, प्रशांत नारकर, सुदर्शन सांगले, नितीन देवकर, दिंगबर बच्छाव, रवी फाटे आणि या भजन मंडळात महिलांचा समावेश आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत होता. आदी मंडळी उपस्थित होती. आणि अश्याप्रकारे ७:२९ डोंबिवली ते सीएसटी प्रवासाने विजयादशमी साजरी होते.

# मनोरंजन कार्यक्रमातून वीज कर्मचाऱ्यांना प्रभावी ग्राहकसेवेचे प्रोत्साहन - मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा

**कल्याण, दि. १४ : प्रतिनिधी**

अखंडीत वीज पुरवठ्याची जबाबदारी पार पाडताना कायम तणावात राहणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मनोरंजन कार्यक्रमातून थोड्याशा विरंगुळ्याची संधी मिळते. यातून मिळणाऱ्या ऊर्जेतून कर्मचाऱ्यांना प्रभावी ग्राहकसेवेचे प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांनी व्यक्त केला.

कोकण प्रादेशिक विभाग, कल्याण परिमंडल, कल्याण एक आणि दोन मंडल तसेच स्थापत्य मंडल कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवलीतील सावित्रीबाई फुले रंग



मंदिरात आयोजित मनोरंजन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक अनिल बऱ्हाटे, उपमुख्य महाव्यवस्थापक योगेश खैरनार, अधीक्षक अभियंते निलकमल चौधरी, मोहन काळोखे, सहायक महाव्यवस्थापक सुशिल पावसकर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहीर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

'प्रेम करावं पण जरा जपुन' या नाटकाचा प्रयोग मनोरंजन कार्यक्रमात सादर करण्यात आला. माधुरी तांबे आणि शेखर दाते निर्मित या नाटकाने उपस्थितांना खिळवून ठेवले. महावितरणचे अधिकारी, अभियंते, कर्मचारी, बाह्यस्त्रोत कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिन कदम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# डहाणू-जव्हार राज्य मार्ग सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन

**डहाणू, दि.१४ : प्रतिनिधी**

डहाणू - जव्हार राज्य मार्ग प्रकल्पाच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन शुक्रवार, ११ ऑक्टोबर रोजी मसोली येथील दशाश्री माळी सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडले. पालघर जिल्ह्यातील डहाणू, विक्रमगड आणि जव्हार तालुक्यांना जोडणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार व पालघरचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या प्रकल्पांतर्गत डहाणू - जव्हार राज्य मार्गाचे नूतनीकरण होणार असून, हा प्रकल्प २५० कोटी रुपयांचा आहे. आर के सी कंपनीच्या माध्यमातून डहाणू पार नाका ते सरावली नाका पर्यंतच्या भागाचे चौपदरीकरण करण्यात येणार आहे, तर सरावली ते चारोटीपर्यंतचा महामार्ग १० मीटर रुंदीचा असणार आहे. हा मार्ग सिमेंट कॉंक्रिटीकरण तंत्राने मजबूत केला जाणार आहे. ज्यामुळे, वाहनचालकांना मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सहजतेने प्रवास करता येईल. यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यासह वाहतुकीची सुरक्षितता देखील वाढणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर डहाणू - जव्हार मार्ग अधिक सुखकर आणि सुरक्षित होईल. चौपदरीकरणामुळे वाहतुकीची क्षमता वाढेल आणि वाहतूक नियोजन सुधारेल.

डहाणूच्या मसोली येथील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या भूमिपूजन सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन केले. ज्याचे थेट प्रक्षेपण सभागृहात दाखवण्यात आले. यावेळी सर्व मान्यवरांनी रस्त्याच्या गुणवत्तेवर भर देत वाहनचालकांसाठी हा प्रकल्प अत्यंत फायदेशीर ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

या भूमिपूजन सोहळ्यात डहाणू आमदार विनोद निकोले, जिल्हाध्यक्ष भरतसिंग राजपूत, आमदार श्रीनिवास वनगा, जिल्हा परिषद उपाध्यक्ष पंकज कोरे, माजी आमदार अमित घोडा सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता सचिन पाटील, उपअभियंता अजय जाधव, आर. के. सी. कंपनी प्रकल्प व्यवस्थापक दशरथ वाघेला इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेकडून नवीन डहाणू लोकलचे स्वागत

**सफाळे, दि. १४ : प्रतिनिधी**

दसऱ्याचे औचित्य साधून पश्चिम रेल्वेने मागील प्रदीर्घ अशा साडेतीन वर्षापासून बंद केलेली डहाणू येथून सकाळी 7:05 ची विरार लोकल 7:00 अशी वेळ बदलून पुन्हा सुरू केली तसेच विरार येथून सकाळी 9:30 ला अतिरिक्त फेरी सुरू करण्यात आली जी सौराष्ट्र एक्सप्रेसची वेळ कव्हर करेल. अशा प्रकारे आज दि. 12/10/2024 पासून डहाणू लोकलच्या 2 अप 2 डाऊन अशा फेऱ्या प्रवाशांसाठी उपलब्ध झाल्या असून ह्या चारही फेऱ्या साठी डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून मागणी केली होती आणि ती पूर्ण केल्याच्या आनंदाने संस्थेच्या माध्यमातून 4:50,7:00, 9:30 आणि 10:25 च्या लोकलचे व मोटरमन पुष्पगुच्छ आणि श्रीफळ ,फुलांचे रोपटे,टि-कप आणि स्विट देऊन वैतरणा, सफाळे, केळवे रोड आणि उमरोळी येथे स्वागत करण्यात आले. ह्या समारंभाप्रसंगी वैतरणा येथे सतिश गावड, सखाराम पाटील, लक्ष्मण वैती, गिरीधर टोकरे तसेच DVPSS वैतरणा स्टेशन कमिटीचे सदस्य, केळवे रोड येथे संस्थेचे अध्यक्ष नागदेव पवार, सचिव दयानंद पाटील ,अमेय सावे व संजय पाटील, तर उमरोळी येथे महेश पाटील ,सरपंच प्रभाकर पाटील आणि नितीन वझे व ग्रामस्थ तसेच सफाळे येथे जतिन कदम,पंकज म्हात्रे आणि DVPSS सफाळे स्टेशन कमिटी सदस्य सहभागी झाले. विशेष म्हणजे केळवे रोड येथे 9:30 च्या लोकलचे आणि मोटरमन गणपत सावंत ह्यांचे स्वागत शाळेय छोट्या विद्यार्थी मंडळी युवराज पवार,स्वनित गावड, हंसराज पाटील यांच्या हस्ते गुलाबफुलाचेगुच्छ, स्विट व टि-कप देऊन करण्यात आले.

# काँग्रेसची विधानसभेसाठी मोर्चेबांधणी



**पालघर, दि. १४ : प्रतिनिधी**

पालघर जिल्हा काँग्रेस कमिटीने येत्या विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केले असून, प्रदेश काँग्रेसतर्फे माजी खासदार हुसेन दलवाई आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी प्रकाश सोनावणे यांनी जिल्ह्यातील सहाही विधानसभेसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलखती घेतल्या. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत हुसेन दलवाई यांनी महाराष्ट्रात सध्या गुंडांचे सरकार राज्य करीत आहे, असा आरोप केला. यावेळी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, प्रवक्ते अविश राऊत, विजय पाटील, सत्यम ठाकूर, रोशन पाटील आणि जिल्ह्यातील अनेक काँग्रेसचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकारांनी हुसेन दलवाई यांना काँग्रेस सोडलेल्या माजी खासदार राजेंद्र गावितांना परत पक्षात घेऊन उमेदवारी देणार का असे विचारले असता, आमच्याकडे निष्ठावंतांची कमी नाही, असे सांगितले.

# सातारकरांच्या भव्य दसरा मेळाव्यात साताररत्न अन् साताराभूषण पुरस्कार वितरण

**मुंबई, दि.१४ : प्रतिनिधी**

मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरात राहून तिथल्या विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या सातारावासियांचा भव्य दसरा मेळावा दादर येथील शिवाजी मंदिर येथे दसऱ्याच्या पूर्वसंध्येवर आयोजित करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना साताररत्न आणि साताराभूषण पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. गेली अनेक वर्षे प्रतिक्षेत असलेल्या सातारा भवनसाठी एका भूखंडाची निवड केली असून लवकरच तो ताब्यात घेऊन त्याची निर्मिती केली जाईल, अशी सुखद घोषणा आम्ही सातारकर विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजाराम (नाना) निकम यांनी भरगच्च सातारकरांच्या उपस्थितीत केली.




या कार्यक्रमावर रतन टाटा यांच्या निधनाचे सावट होते. त्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. यावेळी प्रमुख अतिथी महंत स.भ. मोहनबुवा रामदासी, मठाधिपती श्री विठ्ठल स्वामी (महाराज) वडगांव जयराम स्वामी, कायदेतज्ज्ञ ॲड.उदय वारुंजीकर तसेच अन्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी वितरीत करण्यात आलेले सातारा रत्न पुरस्कार असे – राजकीय रत्न - श्रीमंत रामराजे नाईक-निंबाळकर, कला रत्न – राहुल भंडारे, कामगार रत्न – मनोज धुमाळ, क्रीडा रत्न – विनया माने, साहित्य रत्न – अरुण गोडबोले , शैक्षणिक रत्न – अंजली गोडसे, सामाजिक रत्न – विकास धनवडे, उद्योग रत्न – शिवाजीराव माने, पत्रकारिता – निलेश बुधावले, वैद्यकीय रत्न – डॉ. अरुण माने, कायदा रत्न – ॲड.पांडुरंग पोळ, प्रशासकीय रत्न – सोमनाथ घार्गे (भापोसे ), सहकार रत्न – विनायक गाढवे. याशिवाय सातारभूषण पुरस्कार किरण सोनवणे, संपत शेवाळे, सुरेश गोडसे, प्राची कोल्हटकर-जांभेकर, कु. भार्गव जगताप यांना तसेच वैष्णव चॅरिटेबल व मेडिकल ट्रस्ट, मुंबई यांना प्रदान करण्यात आले. प्रमुख पाहुणे महंत मोहनबुवा रामदासी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सातारा जिल्ह्याचे महत्व विशद केले. या भूमीने अनेक महनीय व्यक्तींना देशकार्यासाठी घडविले, ही पावन भूमी असल्यामुळेच रामदास स्वामी यांनी मराठवाड्यातील जांब येथून सातारा जिल्ह्यात आपले वास्तव्य केले. सत्कारमूर्तींच्या वतीने प्राची कोल्हटकर-जांभेकर, सुरेश गोडसे, ब्रिगेडीयर सुधीर सावंत यांनी मनोगत व्यक्त केले.

संघटनेचे अध्यक्ष नाना निकम, उपाध्यक्ष व माजी आमदार बाबुराव माने तसेच राजाराम शिंदे, महेश पवार, दिपक यादव, श्रीधर फडतरे, दिनकर गाढवे, दत्ताजीराव फाळके, अनिल जाधव, सुभाष चव्हाण, एकनाथ तांबवेकर, शिवाजीराव जाधव, अशोक चव्हाण, रमेश मोरे, पद्मावती शिंदे, आसावरी भोईटे, सागर घाडगे, समर्थ देशमुख आदी विश्वस्त व इतर मान्यवर देखील उपस्थित होते.

# बविआ विक्रमगड विधानसभा लढवणार

## माजी खासदार बळीराम जाधव यांची माहिती

**मोखाडा, दि.१४ : प्रतिनिधी**

बहुजन विकास आघाडी यावेळी विक्रमगड विधानसभा मतदारसंघातून निवडणुक लढवणार असल्याची माहिती माजी खासदार बळीराम जाधव यांनी दिली. जव्हार येथील प्रकुर्ती फॉर्म हाउस येथे माजी खासदार बळीराम जाधव व बहुजन विकास आघाडीचे ज्येष्ठ नेते विल्सन दादा फरगोस यांच्या नेतृत्वाखाली विक्रमगड विधानसभा निवडणुकीची बैठक पार पडली. त्यामधे विक्रमगड विधानसभेचा आढावा घेण्यात आला व विधानसभा लढवण्या संधर्भात चर्चा झाली. उपस्थित सर्व जव्हार,मोखाडा,विक्रमगड ,वाडा तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी यांनी विक्रमगड विधानसभा लढवण्याचा आग्रह केला आणि यावेळी माजी खासदार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की सर्वांनी चांगली मेहनत करून विक्रमगड विधानसभेची बांधणी करून आपला आमदार यावेळी झाला पाहिजे असे जाधव यांनी सांगितले. मोखाडा तालुका अध्यक्ष अमजद अन्सारी यांनी आमच्या सर्व चारही तालुक्यातील कार्यकर्त्यांची मागणी आहे की माजी खासदार बळीराम जाधव यांना उमेदवारी मिळावी असे सांगितले. या ठिकाणी विक्रमगड विधानसभा लढविण्यासाठी इच्छुक उमेदवार म्हणून जव्हारचे एकनाथ दरोडा मोखाड्यातून बंडू नडघे तर विक्रमगड मधून हेमंत खुताडे या नावांची चर्चा यावेळी झाली. माजी उप सभापती बसीर अन्सारी,जव्हार तालुका सचिव रामचंद्र मौले,सल्लागार लक्ष्मण खुताडे ,काशिनाथ दरोडा,रतीलाल फडवळे,उपाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य अनंता धनगरे,उपाध्यक्ष तथातलासरी ग्रामपंचायत सरपंच नितीन पाटील,खडखड ग्रामपंचायत सरपंच सुनंदा घाटा, साकुर ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुनील वळवी,कैलास गांगड, नांदगाव उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य दिलीप वाघ,विलास बागुल,,कैलास पारधी व असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# अमरावतीच्या काँग्रेस आमदारावर निलंबनाची कारवाई

### सुलभा खोडके आता अजित पवारांच्या पक्षात जाणार

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि.१४ :** अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके यांचे निलंबन करण्यात आले आहे. विधान परिषद निवडणुकीत क्रॉस व्होटिंग केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली आहे. काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या निर्देशावरून काँग्रेस पक्ष प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सुलभा खोडके यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. दरम्यान, सुलभा खोडके या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाण्याच्या देखील तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



काँग्रेस आमदार सुलभा खोडके यांनी अमरावती विधानसभा मतदारसंघातून भाजपच्या सुनील देशमुख यांना हरवून विधानसभेत प्रवेश केला होता. महाविकास आघाडी सत्तेत असताना त्यांनी सरकारच्या माध्यमातून मतदारसंघातील कामे करवून घेतली. त्यानंतर सत्तेत महायुतीचे सरकार आल्यावर विशेषतः अजित पवार महायुतीमध्ये सामील झाल्यावर मतदारसंघातील कामांसाठी सुलभा खोडके यांनी निधी मिळवला. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत जवळीक वाढल्याने विधान परिषद निवडणुकीत त्यांनी काँग्रेस उमेदवाराला मतदान केले नसल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. सुलभा खोडके यांनी विधान परिषदेच्या निवडणुकीत असे क्रॉस व्होटिंग केल्याचा आरोप असताना आणखी ५ आमदारांनी खोडके यांच्यासह पक्षविरोधी कारवाया केल्याचे सांगितले जाते. या घटना उघडकीस आल्यावर काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी नाना पटोले यांना सांगून सुलभा खोडके यांना ६ वर्षांसाठी निलंबित करण्याचे निर्देश देत कारवाई केली आहे.

दरम्यान, येत्या काही दिवसांमध्येच सुलभा खोडके या अजित पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचे बोलले जात आहे. अजित पवार यांचा अमरावती येथे मोठी सभा घेत व शक्तिप्रदर्शन करत सुलभा खोडके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्षप्रवेश करणार असल्याचे बोलले जात आहे. २०१९ साली देखील सुलभा खोडके यांच्याकडे दोन पर्याय होते, काँग्रेसकडून निवडणूक लढावी की राष्ट्रवादी काँग्रेसकडून, मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादीत आघाडी असल्याने अमरावतीची जागा काँग्रेसला मिळाली आणि सुलभा खोडके यांनी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवली व भाजपच्या सुनील देशमुख यांचा पराभव केला.

# जि.प. शाळेच्या परसबागेतून विद्यार्थी गिरवताहेत आर्थिक व्यवहाराचे धडे





स महासागर प्रतिनिधी,
कुऱ्हा , दि. १४: अभ्यासाचे धडे गिरवता गिरवता शाळेच्या आवारातील परसबागेत विद्यार्थी कोथिंबीर, पालक भाजी, कारल्याचे पीक घेत त्यातून ते आर्थिक व्यवहाराचे धडे गिरवत आहेत. हे चित्र आहे कधी काळी पारधी बेडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तिवसा तालुक्यातील व कुऱ्हा परिसरातील काळा गोटा येथील जिल्हा परिषद शाळेचे आहे.

अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत तिवसा पंचायत समिती अंतर्गत मारडा केंद्रामधील पारधी समाजाची वस्ती असलेल्या काळा गोटा येथील जि. प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या परसबागेत सेंद्रिय पद्धतीने पिकवलेला भाजीपाला कुऱ्हा येथील बाजारात शुक्रवारी विकायला आणला होता.

जिल्ह्यात प्रथमच शाळेच्या परसबागेतील भाजीपाला बाजारात विद्यार्थी विक्री करत असल्याने नागरिकांची विद्यार्थ्यांच्या स्टॉलभोवती गर्दी झाली होती. नागरिकांनी आनंदाने व उत्सुकतेने पालक, कोथिंबीर, कारले विद्यार्थ्यांकडून विकत घेतले. या वेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

शाळेतील विजयश्री पवार, सौरभ पवार, अर्चना पवार, अनेश पवार, चंचल पवार, प्रशांत चव्हाण हे विद्यार्थी मुख्याध्यापक नितीन पचलोरे व शिक्षक प्रवीण खैरकर यांच्यासोबत होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, व्यवहार चातुर्य, सभाधिटपणा, बाजारपेठेची माहिती आदी गुणांची रुजवण होण्यास मदत होईल, असा विश्वास या प्रसंगी शिक्षकांनी व्यक्त केला, तसेच शाळेतील परसबागेत पिकवलेला भाजीपाला विकून आलेल्या पैशातून बियाणे व विद्यार्थ्यांना लागणाऱ्या लेखन साहित्याचा खर्च भागवला जाईल, असेही शिक्षकांनी सांगितले.

विद्यार्थ्यांसह पालकांनी व्यक्त केला आनंद : पावसाळ्यानंतर विद्यार्थ्यांनी शाळेतील शिक्षकांच्या मदतीने परसबागेत ही पिके घेतली. या प्रकल्पातून विद्यार्थ्यांना भाजी कशी पिकते, बाजारात विकण्यासाठी काय करावे लागते, जुड्या बांधणे म्हणजे काय, खत काय असते याची माहिती मिळाली. त्यातून त्यांना व्यवहारज्ञान मिळत असल्याचे विद्यार्थ्यांसह पालकांनीही समाधान व्यक्त केले.

# चायना चाकूचा वापर, गंभीर गुन्ह्यामध्ये अल्पवयींनाचा समावेश



■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि.** शहरात मागील तीन दिवसात खुनाच्या चार घटना घडल्या आहेत. त्यापैकी तीन खून करण्यासाठी मारेकऱ्यांनी चायना चाकूचा वापर केला आहे. तसेच एका खुनप्रकरणात अल्पवयीन मारेकरी आहेत. त्यामुळे मागील काही दिवसांपासून सहज उपलब्ध होणारे चायना चाकू व अल्पवयीनांचा गंभीर गुन्ह्यात वाढलेला सहभाग पोलिसांसाठी प्रचंड आव्हानात्मक ठरत आहे. दरम्यान अवैध शस्त्र पकडण्यासाठी आता कोम्बिंग ऑपरेशन्स वाढवण्यासोबतच विशेष मोहीम घेऊन ते पकडण्यात येणार असल्याचे पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी बुधवारी ८ ऑक्टोबरला पत्रकार परिषदेत सांगितले.

रविवार६ ते सोमवार ७ ऑक्टोबरदरम्यान शहरात कोतवाली, नागपुरी गेट व बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत खुनाच्या तीन घटना घडल्या. आपसी वादातून झालेल्या त्या तीनही घटनेत चायना चाकू वापरला गेला. कोतवाली हद्दीतील मॉंटी खून प्रकरणामध्ये अल्पवयीनांचा समावेश आढळला. त्यामुळे चायना चाकूचा वापर व अल्पवयीनांचा गुन्हेगारीतील शिरकाव, या बाबी पोलिसांसाठीही आव्हानात्मक असल्या तरी ती गुंडगिरी मोडून काढण्यासाठीच अवैध चाकू वा शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध मोहीम राबवून त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करणार असल्याचे सीपी रेड्डी म्हणाले.

दरम्यान आठ दिवसांपूर्वी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल अरबट यांच्या कारवर झालेल्या गोळीबाराबाबत पोलिस आयुक्तांनी सांगितले कि, आतापर्यंत झालेल्या तांत्रिक तपासात अरबट यांच्या वाहनावर वलगाव हद्दीत गोळीबार झाला नाही. तसेच गोळीबार कोणी व कुठे केला, याबाबतही आमचा सर्वच दिशेने तपास सुरू आहे. लवकरच त्याबाबत माहिती समोर येईल, असेही सीपींनी सांगितले. या पत्रकार परिषदेला पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील आदींची उपस्थिती होती.

# वरुड येथील शासकीय आयटीआयचा नामकरण सोहळा



■ महासागर प्रतिनिधी,
**शेंदुरजनाघाट ,दि. १४ :** वरुड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे संत अच्युत महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण होणे, हा संताच्या कार्याचा गौरव, सन्मान असल्याचे प्रतिपादन केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष कार्य अधिकारी, अमरावती येथील संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलचे उपाध्यक्ष व संत अच्युत महाराज सत्संग मंडळाचे अध्यक्ष सुधीर दिवे यांनी केले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा नामकरण सोहळा दिवे यांच्या हस्ते पार पडला.

त्या प्रसंगी अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या प्रसंगी संत अच्युत महाराज जन्मभूमी संस्थानचे अध्यक्ष दत्ता शिंदे, संत एकनाथ देवस्थानचे गिरिधर देशमुख, राकाँ (अजित पवार) प्रदेश सदस्य प्रमोद पाटील कोहळे, तारेश देशमुख , प्राचार्य व्ही. आर. पडोळे, प्राचार्य किशोर तडस आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सुधीर दिवे यांनी या संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलच्या समाजसेवेची माहिती विषद केली. तसेच भगवान विश्वकर्मा, दसरा पूजनाच्या निमित्ताने या संस्थेतून विश्वकर्मासारखे विद्यार्थी घडवावे, असा आशावादही व्यक्त केला आहे.

या प्रसंगी संत अच्युत महाराज सत्संग मंडळाचे अध्यक्ष सुधीर दिवे यांच्या हस्ते प्राचार्य व्ही. आर. पडोळे, शिल्प निरीक्षक नीलेश गायकी, वरिष्ठ लिपिक सचिन गणोरकर, अशोक.खापरे आदींचा सत्कार करण्यात आला.

प्रारंभी दीप प्रज्वलन करून शस्त्रपूजन व भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक खापरे यांनी केले.

# दुर्गा विसर्जन मिरवणुकीत वर्ध्यात लाठीमार

■ महासागर प्रतिनिधी,
**वर्धा, दि. १४ :** दुर्गादेवी विसर्जन मिरवणुकीची वेळ रात्री १० वाजेपर्यंत देण्यात आली असताना पोलिसांनी डीजेसह वाद्य बंद करण्याच्या सूचना दिल्याने वर्ध्यात तणाव निर्माण झाला होता. दरम्यान, पोलिसांकडून मंडळातील काही सदस्यांवर लाठीमार करण्यात आला.

बोरगाव मेघे, सिंदी मेघे, सावंगी मेघे, पिंपरी मेघे रामनगर, म्हसाळा व आर्वी नाका या परिसरातील दुर्गामातेची विसर्जन मिरवणूक १३ ऑक्टोबर रोजी काढण्यात आली. यासाठी रात्री १० वाजेपर्यंत परवानगी देण्यात आली होती.

त्यामुळे रात्री १० वाजेपर्यंत परवानगी असताना डीजे व ढोल वाजवले जात असल्यामुळे ठाकरे मार्केट परिसरात पोलिसांनी डीजे बंद करण्याच्या सूचना दिल्याने मंडळ पदाधिकाऱ्यांनी जाब विचारला असता राडा झाला. यामध्ये पोलिसांनी मिरवणुकीतील काही सदस्यांवर लाठीमार करण्यात आला. नंतर पोलिस बंदोबस्तात पवनार येथील धाम नदीच्या पात्रात विसर्जन करण्यात आले.

**धानोऱ्यातील दगडफेकीत ६ जखमी, गावात तणाव**

धानोरा (ता. चोपडा) येथे दुर्गा विसर्जन मिरवणुकीला दगडमिश्रित गुलाल फेकल्याने सहा जण जखमी झाले. काही वेळ गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, रात्री सव्वादहा वाजता मिरवणूक चोख बंदोबस्तात पार पडली.

दोषींवर रात्री उशिरापर्यंत गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू होते.

# मफलरने गळा आवळून पतीचा खून

**दारु पिऊन वारंवार मारहाण करणाऱ्या पतीचा त्रास असह्य झाल्याने पत्नीने रागाच्या भरात त्याच्या गळ्यातील मफलरने गळा आवळून त्याचा खून केला.**


■ महासागर प्रतिनिधी,
**घाटंजी, दि. १४ :** दारु पिऊन वारंवार मारहाण करणाऱ्या पतीचा त्रास असह्य झाल्याने पत्नीने रागाच्या भरात त्याच्या गळ्यातील मफलरने गळा आवळून त्याचा खून केला. ही घटना पारवा पोलीस ठाण्याअंतर्गत येत असलेल्या चिखलवर्धा गावात घडली. प्रकाश नैताम वय वर्षे रा. चिखलवर्धा असे मृताचे नाव आहे. सुनीता प्रकाश नैताम वय४५ वर्षे रा. चिखलवर्धा असे आरोपी पत्नीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिखलवर्धा येथे नैताम परिवार वास्तव्यात राहत होते. प्रकाश नैताम याला दारूचे व्यसन असल्याने तो त्याच्या पत्नीसोबत रोजच वाद घालत अस. घटनेच्या दिवशी पहाटे ४ वाजेच्या सुमारास मृतक प्रकाशच्या आईचे आकस्मिक निधन झाले. त्या दिवशीही मृतक दारूच्या नशेत होता. आईचा मृतदेह घरी असताना तो दारु पिवून जोरजोराने ओरडत होता.

त्याला पत्नीने हटकले असता त्याने आप्त नातेवाईकांसमोर तिला मारहाण करून आज तर तुला फाशी देवून मारतो, अशी धमकी दिली. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास आईवर अंत्यसंस्कार करून प्रकाश घरी आल्यानंतर त्याने पुन्हा ओरड सुरू केली. त्यावेळी पत्नीने रागाच्या भरात त्याचा गळा आवळून खून केला. एकाच दिवशी आईचा मृत्यू आणि मुलाचा खून झाला.

# एचव्हीपीएमच्या अनुज सारवानला सुवर्णपदक

### स्व.खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धेत यशस्वी कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. १४:** अमरावती महाराष्ट्र शासन , क्रीडा व युवक संचालनालय पुणे व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे ते ऑक्टोबर या कालावधीत आयोजित कुस्ती स्पर्धेत पाचवेळा विदर्भ केसरी बहुमान पटकावणारे पहिलवान व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. संजय तीरथकर यांचा शिष्य अनुज सारवानने ६३ किलो वजन गटात सुवर्णपदक जिंकले. अनुज हा राष्ट्रीय पदक विजेता आहे. या स्पर्धेत राज्यातील दहा जिल्ह्यांच्या निवडक संघांना आमंत्रित करण्यात आले होते.





विदर्भातला एकमेव संघ अमरावती शहर जिल्हा कुस्तीगीर संघ या स्पर्धेसाठी पात्र ठरला होता. स्पर्धेत फ्रीस्टाइल, ग्रीको रोमन व महिला अशा प्रत्येक संघाचे प्रत्येकी १० खेळाडू एक संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक संघात ठेवणे आवश्यक होते. सिल्लोड येथील दोन कुस्ती मॅटवर या प्रतिष्ठेच्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विजेत्यांना लाखो रुपये पुरस्कार स्वरूपात मिळाले. अमरावती शहर जिल्हा कुस्तीगीर संघाचा मल्ल अनुजची कुस्ती ग्रीको रोमन प्रकारात किलो वजन गटात पहिली कुस्ती धुळ्याच्या अरबाज शेख विरोधात झाली. अनुजने या अशा बलाढ्य पहीलवानाला ४.० – ने एकतर्फी पराभूत केले. दुसऱ्या लढतीत कोल्हापूरचा पहिलवान सागर पाटीलला६-२ –ने धुळ चारली.

चुरशीच्या अंतिम लढतीत साताऱ्याचा मल्ल यश जाधवला आसमान दाखवून अनुज सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. अनुज नियमितपणे एनआयएस प्रशिक्षक जितेंद्र भुयार यांच्या मार्गदर्शनात सराव करतो. एचव्हीपीएमच्या सचिव डॉ. माधुरी चेंडके, प्रा. रवींद्र खांडेकर यांचे त्याला नियमित प्रोत्साहन मिळत असते.

विदर्भ कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, अमरावती शहर जिल्हा संघाचे अध्यक्ष डॉ.श्रीकांत चेंडके, कार्याध्यक्ष डॉ संजय तीरथकर, विदर्भ केसरी सचिव डॉ. रणबीर सिंह राहल, कुस्ती संस्थेचे संरक्षक प्रभाकरराव वैद्य, ॲड. प्रशांत देशपांडे अनुजचे अभिनंदन केले आहे.

२५ हजाराच्या रोख पुरस्कारावर ताबा अनुजने विजेतेपद पटकावल्यामुळे त्याला २५ हजार रोख , प्रशस्तीपत्र व सुवर्णपदक स्पर्धा आयोजकांद्वारे प्रदान करण्यात आले. त्याच्या यशामुळे जिल्ह्यासह विदर्भाच्या कुस्ती क्षेत्रामध्ये आनंदाची लाट पसरली आहे.

### शंभरावर गावांना पाणीपुरवठा करणारे नळगंगा धरण भरले

■ महासागर प्रतिनिधी,
**मोताळा, दि. १४:** जिल्हयातील सर्वात जुने व मोठया जलाशयापैकी असलेले मोताळा तालुक्यातील नळगंगा धरण पुर्णत: भरले आहे. दोन दिवसांच्या पावसामुळे तब्बल दोन वर्षानंतर या धरणाने७१.८६ . दलघमी पूर्ण जल संचय पातळी गाठली आहे. ६६ फुटांपर्यंत या धरणाची पातळी आहे. या धरणामुळे आता या भागातील रब्बी हंगामातील पिकांना सिंचनाचा फायदा होणार आहे. पाटाचे पाणी दिल्या जात असल्याने हजारो हेक्टर शेती सुजलाम, सुफलाम होईल फक्त अवकाळी पाऊस व्हायला नको आहे. या धरणाचा मृत जलसाठा हा २.५४. दलघमी आहे. या धरणावरून मोताळा तालुक्यासह नांदुरा आणी मलकापूर तालुक्यातील जवळपास शंभरावर गावांना पिण्यासाठी पाणीपुरवठा करण्यात येत आहे. १० ऑक्टोबर रोजी धरण पूर्ण भरल्यानंतर गुरुवारी आणी शुक्रवारी या दोन दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर आला आणी धरणात पाण्याची आवक वाढली. त्यामुळे शुक्रवारी रात्री उशीरा धरणाचे पूर्ण अकरा दरवाजे काही इंचापर्यंत उघडण्यात आले होते. हे धरण मातीचे असुन उजवा कालव्याची लांबी ३० किलोमीटर असल्याने त्याचा फायदा या परिक्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी होणार आहे.


एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: नागपूर

L&T Finance

## गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 14.10.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. मेसर्स पुर्वी एंटरप्रायझेस (त्याचे प्रोप्रायटर शंकर सुंदरदास मोटवानी यांच्या तर्फे)<br>2. शंकर सुंदरदास मोटवानी<br>3. कृतिका शंकर मोटवानी | मालमत्तेच्या पत्त्याचे सर्व तुकडा आणि पार्सल: पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक C-1 चा समावेश असलेली सर्व आरसीसी सुपर स्ट्रक्चर, सुपर बिल्ट अप एरिया 55.76 चौ. मीटर्स, महालक्ष्मी अपार्टमेंट नंबर 1 म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि शैलीत असलेल्या इमारतीत भूखंड क्रमांक 506 वर बांधण्यात आले आहे, एकूण क्षेत्रफळ 450 चौ. मीटर (4843.8 चौ. फूट), येथे संपूर्ण जमिनीचा एक भाग असल्याने. क्रमांक 7, 9 आणि 10/1-2 मौजा इंदोरा, नागपूरच्या पाचपोली गृहनिर्माण योजनेतील - इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, बेअरिंग सिटी सर्व्हे क्रमांक 15 आणि पत्रक क्रमांक 14, एनआयटीच्या मर्यादेत आणि एनएमसी बेअरिंग एनएमसी घर क्रमांक 3448/ए/डी/506/सी-1 प्रभाग क्रमांक 57, तहसील आणि जिल्हा नागपूर एकत्र 6.49% विभक्त वाटा आणि सांगितलेल्या जमिनीतील व्याज आणि सीमाबद्ध आहे खालीलप्रमाणे:-<br>सीमा: पूर्व – 9.00 मीटर रुंद रस्ता; पश्चिम – पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक बी-1; उत्तर – प्लॉट क्र. 505; दक्षिण – पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र. D-1 | H177542506210 12015/ H177542 5062101 2015L/ NGPHL2 0000104 | 28 मे 2024 | रु. 2,50,000/- | रु. 62,55,960.35/- | रु. 25,00,000/- | सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून | 06.11.2024 दुपारी 12.00 ते 2.00 |

### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 05/11/2024 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे06/11/2024रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 07/11/2024 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात म्हणजे, **नाव शेखर काळे, एल अँड टी फायनान्स लिमिटेड - कार्यालय क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे -411005 आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल अँड टी फायनान्स लि., - ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं 177, कलिना, उद्धव रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098** कोणत्याही ई-लिलावाच्या टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 15.10.2024
ठिकाण: नागपूर

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

# सुक्ष्मवृतीने अक्षर शोघण्याची कला यांच्याच ठायी!



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

**(जागतिक अंध दिन)**

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात जागतिक अंध दिन किंवा पांढरी काठी सुरक्षा दिन म्हणून साजरा केला जातो, हा एक जागतिक कार्यक्रम आहे ज्याचा उद्देश अंधत्व आणि दृष्टीदोषाकडे लक्ष वेधण्यासाठी आहे. तुम्ही रस्ता ओलांडताना, चालताना संपूर्ण पांढऱ्या रंगाची किंवा वरून दोन तृतीयांश पांढरा आणि खाली एक तृतीयांश लाल रंग असलेली काठी घेऊन चालणारे अनेक लोक पाहिले असतील. हे सर्व लोक देसी डोळे परी निर्मिसी त्यापुढे अंधार अशी निसर्गाची अजब निर्मिती असलेले अर्थात अंध असतात. या दिवशी नॅब (नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड) या संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. ऑक्टोबरचा दुसरा गुरुवार हा जागतिक दृष्टी दिन आहे, आपले डोळे आणि दृष्टी सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्याची, दृष्टीदोष आणि अंधत्वाबद्दल जागरुकता वाढवण्याची आणि नेत्र आणि दृष्टी काळजीला प्रोत्साहन देण्याची संधी.

---

२००० पासून जागतिक दृष्टी दिन साजरा केला जात आहे आणि आता जागतिक आरोग्य संघटनेच्या बरोबरीने अंधत्व प्रतिबंधक आंतरराष्ट्रीय एजन्सीद्वारे समन्वयित केले जात आहे. हे सुरुवातीला लायन्स क्लब इंटरनॅशनल फाऊंडेशनच्या साइटफर्स्ट मोहिमेचा भाग म्हणून पाळण्यात आले.

या दिवशी नेत्र तपासणी किंवा तुमच्या डोळ्यांची काळजी घेण्याचे वचन द्या आणि इतरांना तसे करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी सोशल मीडियावर शेअर करा. या जागतिक दृष्टी दिनाचे आंतरराष्ट्रीय अंधत्व प्रतिबंधक संस्था (आयएपीबी) चे उद्दिष्ट १० दशलक्ष डोळ्यांच्या चाचण्यांपर्यंत पोहोचणे हे आहे आणि नेत्र निगा सेवांसाठी जागरुकता निर्माण करण्याचे वचन दिले आहे. या वर्षी २०२४ मधील जागतिक आरोग्य दिनाची थीम 'माय हेल्थ, माय राइट' अशी आहे आणि आम्ही अधिक सहमत होऊ शकलो नाही. आरोग्य सेवा मिळणे हा मूलभूत मानवी हक्क आहे.

चढउतार, दगडधोंडे, खाचखळगे, कुत्रे, मांजर असे प्राणी, बसलेली-झोपलेली माणसे असे काठीच्या परीक्षेत्रात येणारे सगळेच अडथळे पांढऱ्या काठीचा उपयोग करून पार करता येतात. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पहिल्या महायुद्धानंतर डॉ. रिचर्ड व्हूव्हर यांनी सर्वप्रथम अंधांना चालण्या-फिरण्यासाठी सोयीची पडेल अशी विशिष्ठ स्वरूपाची काठी तयार केली. ती काठी हुव्हर केन म्हणून ओळखली गेली.

१९२१ मध्ये ब्रिस्टलचे फोटोग्राफर जेम्स विंग्ज यांना अपघातात अंधत्व आले. तेव्हा गडद रंगांच्या काठया घेऊन फिरताना वाहनचालक आणि इतर डोळस व्यक्तींना दुरून ती ओळखणे कठीण जात होते. हे लक्षात आल्यानंतर अंधारातही सहजपणे दिसेल, असा पांढरा रंग आपल्या काठीला दिला. डोळा असूनही नसल्यासारखा असतो. पांढरी काठी आम्हांस जणू आमचा डोळाच. कुणाच्याही आधाराशिवाय मुक्तपणे संचार करण्यासाठीचा आत्मविश्वास. ही पांढरी काठी म्हणजे अंधाची आजची जीवन संजीवनी व जीवनसाथी आहे. जागतिक पांढरी काठी दिनानिमित्त लोकांनी अंधांना रस्ता ओलांडताना मदत करणे, साहित्य पुरवून यामध्ये जनजागृती करावी. यामध्ये लोकसहभाग खूप आवश्यक आहे. अंधासाठी पांढरीकाठी म्हणजे त्यांच्या करिता जीवनरेखाच आहे.



तुम्हा-आम्हाला डोळे आहेत, चांगली दृष्टी आहे. त्याद्वारे आपण साऱ्या सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेऊ शकतो. मनमुराद आनंद लुटू शकतो. पण ज्यांना डोळे नाहीत, दृष्टी नाही, त्यांचा कधी आपण विचार केला आहे का? तात्पर्य म्हणजे त्यांचा देखील आपण सामाजिक कर्तव्यबुद्धीने विचार करायला हवा. कारण तेही समाजाचे अविभाज्य घटक आहेत.

दृष्टिहीन लोकांना आपल्या सारखंच जग न्याहाळता यावं आणि त्यांनाही डोळसपणे जीवनदर्शन करता यावं व त्यांना एक नवी जीवनदृष्टी मिळावी, या दृष्टिकोनातून आपण सर्वजण नेत्रदान करण्याचा संकल्प करू या. दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक अंध दिन म्हणून जगभर साजरा केला जातो.

पांढरी काठी घेऊन रस्त्यावर चालणारी व्यक्ती ही अंध आहे याचं सामाजिक भान ठेवून त्याला मदतीचा हात देणं, हा एक कर्तव्याचा भाग आहे, हे लक्षात ठेवावे. जागतिक पातळीवर दृष्टिहीन लोकांची संख्या पाहता, त्यातील २० टक्के लोक एकट्या भारतात आहेत.

अशा गंभीर जागतिक प्रश्नावर रामबाण उपाय म्हणजे प्रत्येक सुजाण नागरिकाने नेत्रदान करण्यास स्वयंस्फुर्तीने पुढे येणं व ही काळाची गरज देखील आहे.

जगात सुमारे १८० दशलक्ष लोक दृष्टिहीन असून, त्यातील जवळ जवळ ३५ दशलक्ष लोक भारतात आहेत. जगातील सुमारे ९० टक्के अंध हे विकसनशील देशांमध्ये राहणारे आहेत. वार्धक्य, बदलती जीवनशैली, गरिबी, निरक्षरता, मानवी विकासाचा अभाव, सामाजिक मागासलेपणा, अत्याधुनिक वैद्यकीय साधन सामुग्रीची कमतरता या प्रमुख गोष्टी अंधत्वाच्या वाढत्या प्रमाणाला कारणीभूत आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणात नमूद केलं आहे.

जागतिक पातळीवर अंधत्व या समस्येवर मात करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय अंधत्व प्रतिबंधक संस्था (आयएपीबी) आणि जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्युएचओ) यांनी संयुक्तपणे २०२० व्हीजन हा कार्यक्रम राबवून, प्रत्येकाला दृष्टीचा अधिकार ही संकल्पना साकार करण्यात पुढाकार घेतला आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी भारतासह ४० देशांनी योगदान देण्याची तयारी दर्शविली, ही उल्लेखनीय बाब आहे.

खरं तर, भारताच्या खालोखाल दक्षिण आफ्रिका व चीन या देशद्वयामध्येही अंधत्वाची समस्या लक्षणीय आहे. वैश्विक स्तरावर जनजागृती करून अंधत्वाच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी प्रभावी व ठोस उपाययोजना केल्या जात आहेत.

जगातील लहानमोठ्या सर्वच देशांनी वैश्विक कर्तव्य या नात्याने या मोहिमेला यशस्वी करण्यात कटिबद्ध व्हावे, हे अपेक्षित आहे. प्रत्येक नेत्रहीन व्यक्तीला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्याच्या मनातील अंध म्हणून न्युनगंडाची भावना घालविण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

केंद्र व राज्य सरकारनेही नेत्रचिकित्सा व कॅटरॅक्टसवर अद्ययावत उपचारपद्धती या बाबींवर भरीव आर्थिक तरतूद करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना नवी दृष्टी देण्यासाठी ठोस पावलं उचलावीत. शासनयंत्रणेने अंधत्व मिटविण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास अंधत्व निर्मूलन अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी होऊ शकते, असे जागतिक आरोग्य संघटनेचे मत आहे.

अंधांसाठी प्रत्येकाने सहानुभूतीपेक्षा स्वानुभूतीची भूमिका अवलंबिली पाहिजे. स्वतःचे डोळे पट्टीने बांधून काही वेळ जगायची अनुभूती घ्यावी, म्हणजे त्यातील गांभीर्य कळून येईल. अंध, अपंग, मतिमंद वा मूकबधिरांना गुणदोषांसह स्वीकारून त्यांना आपलसं करणं यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे.

अंधांना सामाजिक जाणिवेतून रस्ता ओलांडताना मदत करणे, रेल्वे-बसमध्ये बसण्यास आपली जागा देणे, त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधणे, जीवनाशी निगडीत विभिन्न विषयांवर त्यांच्याशी गप्पा मारणे, त्यांचे मनोबल वाढविणे या गोष्टी आपण दैनंदिन जीवनात वावरताना करायला पाहिजेत. इतकेच नव्हे तर, एक पाऊल पुढे टाकून एखाद्या अंध व्यक्तीशी डोळस व्यक्तीचा विवाह करून देऊन त्याचे अंधकारमय जीवन प्रकाशमय करणं हे पुण्यकर्म आपण आपल्या जीवनात करू शकतो.

आजच्या घडीला अंधत्वाची समस्या मिटविण्यासाठी नेत्रदान ही मोहीम लोक चळवळ होणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण मानव म्हणून जीवंतपणी अनेकप्रकारे पुण्यकर्म करीत असतो, हे कौतुकास्पद आहे. तथापि, मृत्यूनंतरही नेत्रदान करून आपण आणखी एका पुण्यकर्मात भर टाकू शकतो. म्हणून ही संधी दवडू नका, यासाठी नेत्रदानाकरिता आधीच इच्छापत्र भरून द्या, जेणेकरून आपल्या मृत्यूनंतर आपली नेत्रं दुस?या अंधव्यक्तीला दान देऊन त्याला नवीन दृष्टी देता येईल. चला तर, नेत्रदान करून अंधत्वाची समस्या मिटविण्यास वचनबद्ध होऊ या.

नियतीने डोळ्यातल्या प्रकाश ज्योती हिरावून घेत ज्या अंध बांधवांचे आयुष्य अंधकारमय करून टाकले आहे, त्यांच्या जीवनात यंदाची दिवाळी आशेचा किरण आणेल अशी आपण सर्व प्रार्थना करू या!

■ ■ ■

# लॉरेन्स घेणार का मुंबईत दाऊदची जागा?



| दाऊद | लॉरेंस |
|---|---|
| किरकोळ गुन्हे, दरोडा आणि फसवणुकीपासून सुरुवात | मारहाण आणि धमक्यांच्या प्रकरणापासून सुरुवात |
| छोटा राजनसोबत नेटवर्क वाढवले, 500 हून अधिक गुंडांची टोळी तयार केली. | कॅनडात बसलेल्या गोल्डी ब्रारसोबत नेटवर्क वाढवले, 700 हून अधिक गुन्हेगार जोडले |
| खंडणी आणि वसुलीच्या माध्यमातून पैसा उभारला | खंडणीतून सर्वाधिक कमाई |

**पूर्वार्ध**



तारीखः 12 ऑक्टोबर, वेळः रात्री 9:30 वा, ठिकाणः खेरवाडी सिग्नल, वांद्रे, मुंबई

राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) नेते आणि महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री बाबा सिद्दिकी त्यांचा मुलगा झिशानच्या कार्यालयातून बाहेर पडले होते. त्यानंतर त्यांच्यावर 6 गोळ्या झाडण्यात आल्या. सिद्दिकींच्या पोटात दोन आणि छातीवर दोन गोळ्या लागल्या. त्यांना तात्काळ लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे रात्री 11.27 वाजता त्यांना मृत घोषित करण्यात आले.

या घटनेनंतर पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली. तीन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई टोळीने घेतली आहे. बाबा सिद्दिकी हे रिअल इस्टेट व्यवसायाशीही संबंधित होते. तथापि, ते राजकारण आणि व्यवसायापेक्षा त्यांच्या बॉलिवूड कनेक्शनमुळे अधिक प्रसिद्ध राहिले.

लॉरेन्स बिश्नोई बाबा सिद्दिकींच्या हत्येद्वारे बॉलिवूड आणि बिल्डर लॉबीमध्ये आपला प्रभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असल्याचे मानले जात आहे. याआधी सलमान खान आणि त्याचे वडील सलीम खान यांना धमकावणे आणि त्यानंतर सलमानच्या घरावर गोळीबार करणे हाही याच प्रयत्नांचा एक भाग आहे. त्याची काम करण्याची शैली अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमसारखी आहे.

लॉरेन्स बिश्नोई टोळीचे जाळे 12 राज्यांमध्ये पसरले आहे. लॉरेन्स गँगने बाबा सिद्दिकी यांना का टार्गेट केले, खरे तर त्यांची सलमानशी मैत्री आहे की डी कंपनीप्रमाणे मुंबईला आपला गड बनवण्याचा प्रयत्न आहे. या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी आम्ही मुंबईचे पोलिस अधिकारी, निवृत्त पोलिस अधिकारी आणि ज्येष्ठ पत्रकार यांच्याशी बोललो.

अंडरवर्ल्डवर 12 हून अधिक पुस्तके लिहिणारे ज्येष्ठ पत्रकार विवेक प्रकाश म्हणतात, 'पहिले सलमान खान आणि त्याच्या वडिलांना धमकावण्यात आले, त्यांच्या घरावर गोळीबार करण्यात आला. आता बाबा सिद्दिकींच्या हत्येतही बिश्नोईचे नाव समोर येत आहे. यावरून लॉरेन्स बॉलिवूड, राजकारण आणि बिल्डर लॉबीमध्ये आपला प्रभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते.

'मुंबईत आपला प्रभाव वाढवण्यासाठी तो बॉलिवूडमधील मोठ्या अभिनेत्याला म्हणजेच सलमान खानला मोहरा बनवत आहे. अंडरवर्ल्डशी संबंधित लोकांनी 70, 80 आणि 90 च्या दशकात ही पद्धत वापरली. यातून मुंबईत खंडणीचे साम्राज्य निर्माण करण्याचा बिष्णोईचा प्रयत्न आहे.

विवेक पुढे म्हणतात, 'लॉरेन्स आणि दाऊद इब्राहिमची मोडस ऑपरेंडी अगदी सारखीच आहे. यामध्ये कोणताही फरक दिसून येत नाही. जसे बाबा सिद्दिकी यांच्यावर हल्ला झाला किंवा त्याआधी सलमान खानच्या घरावर हल्ला झाला.

'डी-कंपनीच्या काळातही शस्त्रे आणण्याचे काम कोणीतरी करायचे. गुन्हा दुसरा कोणीतरी करायचा. या प्रकरणातही तेच दिसून येते. दाऊदने रेकी करण्यासाठी वेगळे लोकही ठेवले होते. या प्रकरणातही तसेच झाले आहे. बाबा सिद्दीकींवर हल्ला करण्यापूर्वी त्यांना त्रयस्थ व्यक्तीने शस्त्रे दिली होती. सर्व पोरांना कामावर ठेवले होते.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आणि फरार आरोपींना बाबा सिद्दिकी यांच्या हत्येचे कंत्राट देण्यात आले होते. बाबांवर हल्ला करणाऱ्यांना प्रत्येकी अडीच लाख रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यांना कामापूर्वी ५० हजार रुपये ॲडव्हान्सही देण्यात आले होते.

विवेक पुढे सांगतात, 'लॉरेन्स एका प्रकरणात दाऊद टोळीपासून वेगळे काम करत आहे. म्हणजेच दाऊदच्या टोळीत ३०-४० वयोगटातील प्रौढ गुन्हेगारांचा समावेश होता. लॉरेन्सच्या टोळीत 700 हून अधिक नवशिक्या आणि दिशाभूल झालेले तरुण आहेत. त्यांचे वय 20 ते 25 वर्षे आहे. लॉरेन्सच्या सांगण्यावरून ते काहीही करायला तयार असतात. ते पैशापेक्षा प्रसिद्धीसाठी काम करतात, तर दाऊदचे गुंड फक्त पैशासाठीच काम करायचे.

बाबांना गोळ्या घालण्याची पद्धत अगदी तशीच होती जी 80-90 च्या दशकात दाऊदचे लोक करत होते. ते त्यांच्या घराजवळील टार्गेटवर हल्ला करायचे. लक्ष्य अगदी जवळून शूट करण्यात आले. याच पद्धतीचा अवलंब करून लॉरेन्सही मुंबईतील बिल्डर लॉबी आणि बॉलिवूड लॉबीमध्ये दाऊदसारखी भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

---

(क्रमशः)

●●●●●

# वाचन प्रेरणा दिन

आज १५ ऑक्टोबर... भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले.

डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही.

आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो.

या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सवार्नी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो.

चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे.

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

●●●●●●●●●

# एकत्र आलो, तर...



राज ठाकरे जे बोलतात ते पूर्ण चुकीचं बोलत नाहीत, हे मी मान्य करतो. स्मारकासाठी त्यावेळी 3 हजार कोटी रुपये देतो म्हणले होते. आज ते 15 हजार कोटी रुपये झालेत. उद्या किती होतील?. परवानगी नसताना नरेंद्र मोदी यांना उद्घाटनासाठी बोलावलं, फसवण्याचा प्रकार सुरू आहेह्व अशी टीका संभाजी राजे भोसले यांनी केली. गडकोट किल्ल्यांसाठी या 75 वर्षात सत्ताधारी, विरोधकांनी काय केले याचं उत्तर द्या. गड-किल्ले हे जिवंत स्मारकं आहेत, त्याचं संवर्धन व्हायला पाहिजे. मी सरकारकडे 25 किल्ले दत्तक मागितले आहेत, आम्ही पैसे उभे करतो असं म्हटलं तरी ते द्यायला तयार नाहीतह्व असं संभाजी राजे म्हणाले. ह्वराज ठाकरे आणि मी या विषयावर एकत्र आलो, तर महाराष्ट्र गड किल्ल्याच्या विषयाला चांगली दिशा देऊ शकतो असं संभाजी राजे म्हणाले.

विधानसभेला मनसेसोबत एकत्र येणार का? यावरही संभाजी राजे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरेंचं वेगळं व्यक्तिमत्व आहे. आमचं वेगळ व्यक्तिमत्व आहे, एकत्र येऊ हे नाकारू शकत नाही. राज ठाकरेंनी स्वबळाचा नारा दिला हे चांगली गोष्ट आहे. त्यांची ताकद आहे. आमची सुरुवात आहे, म्हणून आम्ही महाशक्ती निर्माण केली आहे, प्रस्थापितांपेक्षा आम्ही विस्थापितांना तिकीट देऊ, प्रस्थापित लोक आले तर त्यांना स्वीकारून सुद्धा. महाशक्तीमुळे वातावरण बदलायला लागलं आहे, चैतन्य निर्माण झालं आहे. त्यांना चांगला पर्याय मिळत आहेह्व असं संभाजी राजे म्हणाले.

संभाजी राजे यांनी बोलताना अशोक चव्हाण यांच्यावर टीका केली. नांदेडमधील एमआयडीसीच उदाहरण घ्या. सगळे लोक पुण्या-मुंबईला जात आहेत. नांदेड मोठे शहर आहे. सगळ्या मोठ् मोठ्या नेत्यांनी जमीन ताब्यात घेतल्या आहेत, कब्जा घेतला आहे. नांदेडमध्ये इंडस्ट्री उभी राहिली नाही. देशाचे नेतृत्व केलेले शंकराव चव्हाण सारखे नेते या ठिकाणी होऊन गेले आहेत.

त्यांचे चिरंजीव खासदार आहेत ते मुख्यमंत्री होते, आयुष्यभर ज्या काँग्रेसने त्यांना पोसलं ते स्वतःची नीतिमत्ता सोडून गेले दुसरीकडे. हे चालणार आहे का ? लोक स्वीकारणार आहेत का ? आणि जे घेतात ते सुद्धा सरळ माणसं आहेत का ? अशी टीका संभाजी राजे यांनी केली. गोंधळाचा राजकारण सुरू आहे. हा गोंधळ स्वच्छ करायचा असेल तर स्वराज्य पक्षाची निर्मिती झाली आहे असं ते म्हणाले.

# रोज एक सफरचंद खा, डॉक्टरांना दूर ठेवा

'ऐन एप्पल अ डे, कीप्स डॉक्टर अवे' ही म्हण तुम्ही ऐकलीच असेल. याचा अर्थ असा की जर तुम्ही रोज एक सफरचंद खाल्ले तर तुम्हाला कोणताही आजार होणार नाही आणि डॉक्टरांकडे जावे लागणार नाही. एकेकाळी युरोपातील वेल्समध्ये जन्मलेली ही म्हण आता जगभर लोकप्रिय आहे.

सफरचंद हे गोडपणा आणि रसाळ चवीमुळे जगातील सर्वाधिक खाल्ल्या जाणाऱ्या फळांपैकी एक आहे. जगभरात 7500 पेक्षा जास्त जाती उगवल्या जात आहेत. स्टॅटिस्टामध्ये प्रकाशित झालेल्या आकडेवारीनुसार, 2022 मध्ये जगभरात 9 हजार 584 मेट्रिक टन सफरचंदांचे उत्पादन झाले. दरवर्षी त्याची मागणी झपाट्याने वाढत आहे.

सफरचंद खूप आवडते कारण ते सहज चालता चालता खाल्ले जाऊ शकते आणि त्याची चव अप्रतिम आहे, परंतु बहुतेक लोकांना हे माहित नाही की सफरचंदमध्ये जवळजवळ प्रत्येक खनिज आणि पोषण असते, ज्याची आपल्या शरीराला गरज असते. यामुळे अनेक आजारांपासून आपले संरक्षण होते.

1866 मध्ये वेल्स, युरोपमधील एका लेखात असे लिहिले होते की, 'ईट ॲन ॲप्पल ऑन गोइंग टु बेड अँड यू विल कीप द डॉक्टर फ्रॉम अर्निंग हिज ब्रेड'. याचा अर्थ दररोज झोपण्यापूर्वी एक सफरचंद खा आणि डॉक्टरांना त्यांची रोजी-रोटी कमावू देऊ नका.

हे थोडे मजेदार वाटले असेल, परंतु ते आश्चर्यकारक होते. अन्यथा, शंभर वर्षे उलटून गेल्यावर ते जगभर प्रसिद्ध होण्याचे काय कारण असावे. वाक्याचे स्वरूप थोडेसे बदलले आणि 1913 मध्ये ते'ऐन एप्पल अ डे, कीप्स डॉक्टर अवे' असे बदलले आणि ते जगभरात लोकप्रिय झाले.




सफरचंद हे पौष्टिक फळ आहे. त्यात महत्त्वाची खनिजे, जीवनसत्त्वे, फायबर आणि कार्ब्स मुबलक प्रमाणात असतात. त्यात कोणती खनिजे आणि जीवनसत्त्वे आहेत. सफरचंद सहसा झाडापासून कच्चे तोडले जातात. कच्च्या फळांची सुरक्षित वाहतूक करणे सोपे आहे. त्यामुळे व्यावसायिक कारणांसाठी पिकवलेली बहुतांश फळे कच्ची तोडली जातात. यानंतर ते पटकन पिकवण्यासाठी अनेक वेळा कॅल्शियम कार्बाइडसारख्या रसायनांचा वापर केला जातो. हे रसायन आरोग्यासाठी हानिकारक आहे.

सत्य हे आहे की सफरचंद स्वतः इथिलीन वायू सोडते. ते पिकवण्यासाठी वेगळे रसायन वापरण्याची गरज नाही. ते कोणत्याही रसायनाशिवाय आपोआप पिकते. म्हणून, जर तुम्ही कच्चे सफरचंद खरेदी करत असाल तर ते स्वतःच हळूहळू पिकू द्या आणि नंतर ते खा.

**सफरचंद खाण्याचे अनेक आरोग्य फायदे**

सफरचंद खाण्याचे अनेक आरोग्य फायदे आहेत. यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. मधुमेह आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो. याशिवाय हृदयविकार आणि कर्करोगासारख्या आजारांचा धोकाही कमी करू शकतो. ●●●●●

( उर्वरीत भाग उद्याच्या अंकात )

## अशोकायन

### बळीराजा

नाव मोठं
दर्शन खोटं
बळीला किंमत
आहे का कुठं ?..

मोठेपणाची झुल
दिली अंगावर
ऐश करताहेत
सारे त्याच्या जीवावर..

बळी नाही संघठीत
जुमानेना कोणी
व्यापारीही करती
आपलीच मनमानी



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# भक्तिमार्ग


## भीतीला समोरं जायला हवं!

ओशो वाणी

ओशोंनी भयाची खूप सुंदर व्याख्या केली आहे. ते म्हणतात, भयाला मारताही येत नाही आणि जिंकताही येत नाही. फक्त समजून घेता येतं. भीतीवर मात करण्याचा प्रयत्न केला तर ती दबून राहते. म्हणूनच असा प्रयत्न करुन काहीही साधत नाही. उलट गोष्टी कठीण होऊन बसतात. त्यामुळे भीतीला जिंकण्याचा प्रयत्न करु नका तर ती दाबून ठेवा. इतक्या आत दाबून ठेवा की भीतीची जाणीवही होणार नाही. हे कौशल्य असेल पण तुम्ही भयमुक्त आयुष्य जगू शकाल. आत कुठेतरी पडून राहिल्यामुळे भय वरचढ होण्याचा प्रयत्न करणारच. भीतीने तुमचा ताबा कधी घेतला हे कळणारही नाही. ही बाब अधिक दु:खदायी, वेदनादायी असेल. त्यामुळे भीतीला जिंकायचं नाही, भयाला मारायचंही नाही. कारण भयात विशिष्ट प्रकारची ऊर्जा असते. कोणत्याही ऊर्जेला नष्ट करता येत नाही. भय ही क्रोधाची नकारात्मक अवस्था आहे तर सजगता आणि सावधपणा ही भयाची सकारात्मक अवस्था आहे. त्यामुळेच भीतीबाबतचे सर्व विचार, मानसिकता दूर सारा. भीतीला समोरं जायचं आहे हे कायम लक्षात ठेवा. एकदा भयाची दाहकता समजून घेतल्यानंतर त्यावर उपाय करता येतो. दुसरं काही करण्याची गरजच नाही. जाणीव किंवा समजातूनच भयाचं एखाद्या सकारात्मक बाबीमध्ये रूपांतर करता येतं.

## सावताने केला मळा

अमृतवाणी



ऐहिक जीवनात कर्तव्यकर्मे करत असताना काया-वाचा आणि मनाने विठ्ठलभक्तीत तल्लीन झालेल्या संत सावता महाराजांचा हा अभंग प्रपंचात राहूनही ईश्वरासमीप जाण्याचा मार्ग सांगणारा आहे. संत ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील या ज्येष्ठ संताने आपल्या अनेक अभंगांमधून जनसामान्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखवला आहे.


आमुची माळियाची जात।
शेत लावूं बागाईत।।
आम्हा हातीं मोट नाडा।
पाणी जातें फुलवाडा।।
शांति शेवंती फुलली।
प्रेम जाई जुई
व्याली।।
सावताने केला मळा।
विठ्ठल देखियला डोळा।।

– संत सावता माळी

## आत्मबोधाची बैठक हवी

समर्थ उवाच

*मृत्यू न म्हणे थोर थोर।*
*मृत्यू न म्हणे हरिहर।*
*मृत्यू न म्हणे अवतार।*
*भगवंताचे।।*
*ऐसे जाणोनियां जीवें। याचे*
*सार्थकचिं करावे। जनी मरोन*
*उरवावे। कीर्तिरुपें।।*
*असो ऐसे सकळही गेले। परंतु*
*येकचि राहिले। जे*
*स्वरुपाकार जाले।*
*आत्मज्ञानी।।*



लहान असो वा थोर, कनिष्ठ असो वा ज्येष्ठ, निगर्वी असो वा गर्विष्ठ, भित्रा असो वा शूर... मृत्यू सर्वांना एकासारख्या मापानेच मोजतो. ईश्वरी अवतार असणारे पुरुष, संत-महंतही अखेरीच मृत्यूपंथानेच या जगातून गेले आहेत. एवढचं नव्हे तर हरि आणि हर म्हणजे प्रत्यक्ष श्रीविष्णू आणि भगवान शंकर यांचे पृथ्वीवरील अवतारही याच जीवनचक्रानुसार व्यतित झाले आहेत. म्हणजेच मृत्यू कोणाचीही पर्वा करत नाही, हा बोध अंतिम पर्वात घेण्याऐवजी वेळीच घ्यावा आणि आयुष्याचं सार्थन करुन घ्यावं असं श्रीसमर्थ सांगतात. त्यासाठीचा मार्ग सांगताना ते म्हणतात, या आयुष्याचं सार्थक करायचं असेल तर सतत चांगलं कार्य करत रहावं. त्यामुळे यमदूत घेऊन गेले तरी कीर्तीरुपाने आपण सतत लोकांच्या मनात जीवित राहू.

जरा मरण भय त्यागुनि। प्राज्ञे ज्ञान वित्त जोडावे। ओढी केश यम असे कल्पुनी। धर्मपरायण व्हावे।।

मृत्यूचं भय सोडून ज्ञानार्जन करत रहावं आणि कधी ना कधी मृत्यू येणारच आहे हे जाणून धर्म, न्याय आणि नीतीने वागावं. समर्थ म्हणतात, सर्वजण अशा त्याच एका मृत्यूमार्गाने जात असतात. कोणीही चिरंजीव नाही. परंतु आत्मज्ञान प्राप्त केलेले आणि परमतत्त्वाशी एकरुप झालेले किंवा ज्यांनी जिवंतपणी असामान्य लोकोत्तर कार्य केलं आहे असेच लोक चिरंजीव होतात. अशा रीतीने श्रोत्यांच्या मनाची आत्मबोधाची बैठक तयार करुन श्रीसमर्थ त्यांना आत्मज्ञान प्राप्त करण्याच्या प्रयत्नास लागण्याचा आग्रह धरतात.

## कसं पहावं पुराणकथांकडे?

भक्ती विशेष





**रामायण, महाभारत आदी ग्रंथाकडे पुराण म्हणून पाहिलं पाहिजे. पण आपल्याकडे त्याकडे काव्य म्हणून पाहिलं जातं. काव्य कल्पित असतं. तो उत्कट भावनेचा उद्रेक असतो. उत्कट भावना अथवा भावनोत्कटता ही एक ऊर्जा असते. उत्कट अविष्कार हा त्या ऊर्जेचाच भाग असतो. भावनेच्या अविष्काराला मानवी स्वभाव, कृती-उक्ती, घटना-प्रसंग, स्थलकाल आदींची जोड लाभली की भावनेची पूजा कथेचं रुप धारण करते.**

'पुराणातली वानगी पुराणातच बरी' अशी एक म्हण आपल्याकडे वापरली जाते. काळ बदलला की सामाजिक, वैयक्तिक जाणिवा बदलतात, समाजधारणेमध्ये बदल होतो. त्यामुळेच प्रदीर्घ काळ मागे पडल्यानंतर पूर्वीची उदाहरणं देऊन सध्याच्या समाजाकडून तेव्हाच्या तत्त्वाचं, मूल्यांचं पालन व्हावं अशी अपेक्षा धरणं चुकीचं आहे. पूर्वीच्या मूल्यांचा, तत्त्वांचा अवश्य मान राखायलाच हवा. मात्र महाकाव्यं कल्पनाविष्कार असतात, जनांना प्रबोधित करण्याचं साधन असतात, पूर्वघटनांचा सविस्तर वृतांत त्यात शब्दबद्ध केलेला असतो आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तो त्यावेळचा सामाजिक इतिहास असतो. त्यामुळेच पुराणकथांकडे, देशावर सर्वकालीन प्रभाव पाडणाऱ्या रामायण-महाभारतासारख्या महाकाव्यांकडे यादृष्टीने पहायला हवं. देवी-देवतांच्या नावाने राजकारण न करता, क्षुल्लक स्वार्थासाठी या पौराणिक व्यक्तिरेखांचा वापर न करता मोठ्या आयामातून त्यांच्यासंबंधीच्या काव्याचा, घटनांचा, कथांचा वेध घ्यायला हवा. परमेश्वर हे सृष्टीच्या आणि सृष्टीतील चेतन-अचेतन, सजीव-निर्जीव, मनुष्य-मनुष्येतर निर्मितीचं मूळ आहे. यात एकातून अनेक अथवा अनंत हाच क्रम आहे. पण तो अनाकलनीय आहे. म्हणूनच या सर्वांचं प्रतिबिंब असणारं अध्यात्म अनेकांना गूढ भासतं. हे गूढ उकलण्याच्या प्रयत्नात माणसाला अनेक ज्ञानशाखा अवगत होत गेल्या. पण या ज्ञानशाखांच्या मुळांशी सुद्धा 'एक' आहे आहे आणि ते 'विज्ञान' आहे. ज्याला आपण विज्ञानाची प्रगती म्हणतो त्यासही हा क्रम आहे. म्हणून विज्ञानाच्या प्रगतीचा इतिहास मांडता येतो.

आजपर्यंत अस्तित्वात असलेल्या सर्व समाजाचा इतिहास हा वर्गलढ्याचा इतिहास आहे, असा सिद्धांत मांडणाऱ्या कार्ल मार्क्सला समाजाच्या विकासाचे वस्तुनिष्ठ नियम शोधून काढताना इतिहासात अंतर्भूत असणारा हा क्रम नजरेआड करता आला नाही. रामायण, महाभारत, भागवत हे नुसतेच पुराण नाही तर त्यात अद्भुत, अलौकिक, वास्तवाच्या संदर्भात असंभाव्य आणि प्रसंगोपात असंबद्ध वाटणाऱ्या कथा आहेत हे खरं असलं तरी ते अध्यात्म सांगण्यासाठीच पुराणात चरित्रपर गोष्टी आहेत. वर्तमानकाळातील संदर्भाच्या परिप्रेक्षातून पाहता या कथा आपल्याला अप्रस्तुत वाटतात. बरेचदा त्या भाकडकथाही वाटू शकतात. समाजप्रबोधनाच्या काळात धर्म आणि समाज सुधारणेची प्रक्रिया सुरु झाली त्यात सुधारकांनी याच भूमिकेतून पुराणकथांवर हल्ला चढवला. विद्यमान काळातले परिवर्तनवादीही यापेक्षा काही वेगळं करत नाही. या सगळ्या पौराणिक कथांचं थोतांड माजवून समाजातील उच्चवर्णियांनी बहुजनवर्गाचं शोषण केलं असा सिद्धांत मांडला की पौराणिक वाङ्मय आणि त्यात ज्या पुराणपुरुषाचं 'अनंत' व्यापलेलं आहे हे सगळंच नाकारावं लागतं. प्रचलित परिभाषेत सांगायचं तर परमेश्वराचं अस्तित्वच मानलं नाही तर या पुराणकथा अथवा भाकडकथा मानण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परमेश्वराचं अस्तित्व नाकारल्याशिवाय अंधश्रद्धा निर्मूलन होणं शक्य नाही असं आज काही जण म्हणतात तर काही विचारवंत अंधश्रद्धा निर्मूलनासाठी परमेश्वराचं अस्तित्व नाकारणं गरजेचं आहे या मताचं खंडन करतात. पण खरं सांगायचं तर परमेश्वराचं अस्तित्व मानायचं की नाही या प्रश्नाचं निर्णायक उत्तर आजपर्यंत कोणालाही देता आलेलं नाही.

रामायण, महाभारत आदी ग्रंथाकडे पुराण म्हणून पाहिलं पाहिजे. पण आपल्याकडे त्याकडे काव्य म्हणून पाहिलं जातं. काव्य कल्पित असतं. तो उत्कट भावनेचा उद्रेक असतो. उत्कट भावना अथवा भावनोत्कटता ही एक ऊर्जा असते. उत्कट आविष्कार हा त्या ऊर्जेचाच भाग असतो. भावनेच्या अविष्काराला मानवी स्वभाव, कृती-उक्ती, घटना-प्रसंग, स्थलकाल आदींची जोड लाभली की ती भावना कथेचं रुप धारण करते. क्रौंचवधामुळे वाल्मिकीला जाणवलेली संवेदना, अनुष्टुम छंदातून तिचा झालेला आविष्कार आणि त्यातून वाल्मिकीनं रचलेलं रामायण हे सर्व काव्यच आहे. म्हणजे पुन्हा हे कल्पित, असंभाव्य, पुराण ही धारणाही पद्धतशीरपणे जोपासली जाते. विद्यमान काळात रामायण, महाभारताविषयी दोन भूमिका दिसतात. त्यापैकी एक भूमिका क्रांतीवाद्यांची, परिवर्तनवाद्यांची आहे. अंधश्रद्धा निर्मूलन हे परिवर्तनाचे एक साधन आहे. रामायण, महाभारत हे पुराण ग्रंथ आहेत. ते काव्यग्रंथही आहेत. इतकंच नव्हे तर त्यात धर्म आणि अंधश्रद्धाच जोपासलेल्या आहेत आणि त्यामुळेच हे सगळंच नाकारणं ही तथाकथित बुद्धिवादी भूमिका आहे तर सगळ्याच्या मुळाशी असणारी भावना जोपासण्यासाठी घेतली जाणारी श्रद्धावादी भूमिका आहे. ही भूमिका नेहमी परिवर्तनवादाच्या विरोधी म्हणजे पुनरुज्जीवनवादी असते.

पुराणकथांमधून पुराण पुरुषावरील श्रद्धा जोपासली जाते. माणसाचं भावनिक पोषण होतं. परंतु मनुष्यास आपल्या भौतिक अभ्युदयासाठी प्रेरणादायक ठरणारा कोणताही विचार व्यक्त होत नाही. परिवर्तनवाद्यांनी रामायण, महाभारतादींकडे इतिहास दृष्टीने पाहिलंच नाही. पण या पुराण ग्रंथात नुसता धर्म आणि अंधश्रद्धा नव्हे तर सामाजिक इतिहाससुद्धा असतो. परंतु सामाजिक दृष्टीतून रामायण, महाभारताचे अर्थ लावण्याचा प्रयत्न कधीच होत नाही. त्यातील भाकडकथा सोडून द्या, देवधर्म सोडून द्या, अंधश्रद्धा सोडून द्या पण त्यातील मानवी समाजाच्या इतिहास नक्कीच सोडून देण्यासारखा नाही. कारण पुराण कथा मानवी समाजाच्या विकासातल्या एक टप्पाच आहेत. रामाच्या काळात भावाभावांमध्ये युद्ध झालं नाही. कृष्णाच्या काळात मात्र परिस्थिती बदलते. त्याकाळात सख्ख्या भावाभावात युद्ध होतं. अशाप्रकारे पुराणकथांमध्ये सामाजिक आणि मानवी संबंधांचे कवडसे उतरतात. म्हणूनच रामायण-महाभारताकडे सामाजिक इतिहास म्हणून पाहणं शहाणपणाचं ठरेल.

## राहील शनीची कृपादृष्टी

जाणून घ्या

अनेकांना नवग्रहांमध्ये सातव्या स्थानी असणाऱ्या शनीची भीती वाटते. साडेसाती, महादशा या कारणांमुळे लोक शनीदेवापासून थोडे लांबच राहतात. पण प्रत्यक्षात शनी कोणाचंही काही वाईट करत नाही. त्याच्याकडे कर्मांचा हिशेब ठेवण्याचं काम असतं. ही एक न्यायप्रिय देवता आहे. शनिवारी या देवतेची आराधना आणि पूजा केल्याने बरेच लाभ मिळतात. साडेसातीचा प्रभाव कमी होतो तसंच कुंडलीतले दोष दूर होण्यास मदत होते.



विशिष्ट पद्धतीने पूजा केल्याने शनीदेव प्रसन्न होतो. तो सूर्य आणि छाया यांचा पुत्र आहे. ज्येष्ठातल्या अमावस्येला शनीचा जन्म झाला. कोणत्याही शनिवारपासून यमाचा अग्रज असणाऱ्या शनीच्या आराधनेची सुरुवात करता येते. पूजनाचा संकल्प केल्यानंतर शूचिर्भूत होऊन काळी वस्त्र परिधान करावी. शनीपुढे राई किंवा तीळाच्या तेलाचा दिवा लावावा. यासोबत काळे तीळ, उडिद किंवा कोणतीही काळी वस्तू शनीला अर्पण करावी. यावेळी शनी चालिसा किंवा शनी गायत्री मंत्राचा जप करावा. शनीला चालिसा खूप प्रिय आहे. या उपायांचा अवलंब करुन शनीची पीडा दूर करता येईल.



## सुप्रसिद्ध जाखू हनुमान मंदिर

तीर्थाटन

हनुमान ही अनेकांची इष्ट देवता. छोटं गाव असो किंवा महानगर... सगळीकडे बजरंगाचं एक तरी मंदिर असतंच. असंच एक मंदिर सिमल्यातल्या जाखू टेकडीवर आहे. रामायण काळापासून या स्थानाचं अस्तित्व असल्याचं बोललं जातं. टेकडी परिसरातील वानरं आजही हनुमानाची वाट बघत असतात अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे. मंदिराच्या प्रांगणात हनुमानाची १०८ फूट उंच मूर्ती आहे.

या मंदिराशी संबंधित एक कथा प्रचलित आहे. ती अशी की, लक्ष्मण बेशुद्ध पडल्यानंतर हनुमान संजीवनी वनस्पती आणण्यासाठी निघाला. त्यावेळी तो याच स्थानावरून गेला. इथे यक्ष ऋषी तपश्चर्या करत असल्याचं पवनपुत्रानं पाहिलं आणि त्यांची भेट घेतली. इतकंच नव्हे तर परतीच्या प्रवासात पुन्हा भेट घेण्याचं आश्वासन देऊन त्याने यक्षांचा निरोप घेतला. पण संजीवनी घेवून परताना कालनेमी नामक राक्षस आडवा आल्यामुळे हनुमानाने परतीचा दुसरा मार्ग निवडला. तिकडे यक्षांना बजरंगबलीच्या भेटीची ओढ लागली होती. ते आतुरतेने हनुमानाची वाट बघत होते. हनुमानाने अंतर्ज्ञानाने त्यांची ही तळमळ जाणली आणि प्रसन्न होऊन त्यांना दर्शन दिलं. त्याच वेळी टेकडीवर स्वयंभू मूर्ती प्रगट झाली. यक्षांनी हे मंदिर बांधून हनुमानाच्या मूर्तीची स्थापना केली, असं म्हटलं जातं. स्थानमहात्म्यामुळे इथे सतत भाविकांची मोठी गर्दी असते. सिमल्याला येणारे पर्यटक मंदिराला भेट दिल्याशिवाय जात नाहीत. यक्षऋषींमुळे या टेकडीला 'जाखू' हे नाव पडल्याचं मानलं जातं.



## इथे होते तांडव आरती

अजब गजब

भगवान शंकर म्हणजे भोळा सांब. भक्तांच्या हाकेला धावून जाणाऱ्या भोलेनाथाचे भक्त मोठ्या संख्येने आहेत. शंकराची अनेक मंदिरं आहेत. तिथे नेहमीच शिवभक्तांची गर्दी पहायला मिळते. मध्य प्रदेशातल्या इंदूरमध्ये असंच एक मंदिर आहे. 'गेंदेश्वर महादेव' नावाने प्रसिद्ध असणाऱ्या या स्थानी देशभरातून भक्तमंडळी येतात. गेंदेश्वर महादेवाची दुपारची आरती वैशिष्ट्यपूर्ण असते. देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी इथे तांडव आरती होते. ती जवळपास एक तास सुरू असते. मंदिरातले पुजारी एका पायावर उभं राहून आरती करतात. हा सोहळा पाहण्यासाठी भक्त खूप लांबून लांबून इथे येतात.

इंदूरच्या परदेशीपुरी भागातल्या या मंदिरात श्रावणात तर खूपच गर्दी असते. १५ वर्षांपासून इथे तांडव आरती केली जाते. यावेळी पुजारी १३ फूट लांब रेशमी सोवळं नेसतात. टिळा लावून पगडी घालतात. इतकंच नाही तर अंगावर १,१०० रूद्राक्षांच्या माळा धारण करतात. आरतीच्या वेळी केल्या जाणाऱ्या तांडव नृत्याच्या मुद्रा पाहून भक्त हरखून जातात.

पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत इथे साधी आरती केली जायची. पण एके दिवशी आरतीच्या वेळी पुजाऱ्यांचे हात थरथरू लागले. तेव्हापासून याठिकाणी तांडव आरतीची परंपरा सुरू झाली. तांडव आरती होणारं गेंदेश्वर महादेव हे जगातलं एकमेव मंदिर असून मंदिराच्या गाभाऱ्यात बारा ज्योतिर्लिंगं तसंच चार धामांच्या प्रतिकृतीही लक्षवेधी आहेत.

## कर्ण युद्धभूमीवर का नव्हता?

महाभारतातून...

कौरव-पांडवांमधलं कुरूक्षेत्रावरील युद्ध तब्बल अठरा दिवस सुरू होतं. अर्जुनाला रोखण्याची क्षमता फक्त कर्णामध्ये असल्याचं दुर्योधन जाणून होता. म्हणूनच त्याने कर्णाला पुढे केलं. पण पहिले दहा दिवस तो या युद्धात सहभागी झाला नव्हता. यामागचं कारण काय असावं? जाणून घेऊ या.

अज्ञातवासानंतर पांडवांनी मूळ रूप धारण केलं. विराट नगरात त्यांचे हितचिंतक जमले. पांडवांना त्यांचं राज्य परत मिळायला हवं यावर उपस्थितांचं एकमत झाल्याने द्रुपद राजाने धृतराष्ट्राकडे दूत पाठवला. पांडवांचा वनवास आणि अज्ञातवास पूर्ण झाल्याने त्यांना राज्य परत करावं, असा संदेश त्याने पोहोचता केला. धृतराष्ट्राने पुरेशा विचारविनिमयानंतर संजयला युधिष्ठिराकडे पाठवलं. धृतराष्ट्राला युद्ध नाही तर शांतता हवी असल्याचं संजयने सांगितल्यानंतर आपणही शांतता प्रिय असून इंद्रप्रस्थावर आमची सत्ता असायला हवी, असं युधिष्ठिर म्हणाला. पांडवांना पाच गावं मिळाली तरी युद्ध टाळता येईल, अशी पुस्ती श्रीकृष्णाने जोडली. हस्तिनापुरात परतलेल्या संजयने भर सभेत हा प्रस्ताव ठेवला. धृतराष्ट्र, कृपाचार्य, द्रोणाचार्य, भीष्म आदी महारथींनी समर्थनपर मान डोलावली. पण दुर्योधन आणि कर्ण यांना हा प्रस्ताव मान्य नव्हता.



धृतराष्ट्र दुर्योधनाची समजून काढत असताना कर्ण आपलं म्हणणं मांडत राहिला. कर्णाचं असंबद्ध बोलणं ऐकून भीष्मांना राग आला आणि त्यांनी त्याला फटकारलं. यामुळे कर्ण रागावला. भीष्माचा अंत झाल्यानंतरच मी युद्धभूमीवर येणार असल्याचं सांगून तो निघून गेला. त्यामुळे भीष्म कौरवांचे सेनापती असेपर्यंत कर्णाने कुरूक्षेत्रावर पाय ठेवला नाही. ते घायाळ झाल्यानंतरच तो कौरवांच्या बाजूने लढायला सज्ज झाला. हा काळ दहा दिवसांचा असल्यामुळे कर्ण पहिले दहा दिवस युद्धभूमीवर उपस्थित नव्हता.

## अडचणींवर मात करा

आत्मबोध



प्रत्येकाला अनंत अडचणींना सामोरं जावं लागतं. पण त्यांच्यापुढे हार न मानता मार्ग शोधणं गरजेचं असतं. समस्या आपसूक दूर होत नाहीत. त्यासाठी आपणच प्रयत्न करायला हवेत. साधू आणि भोलाच्या या कथेतून आपण ही बाब समजून घेऊ या.

भोला नावाचा एक मजूर शेतात राबून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत असे. समजायला लागल्यापासून अडचणींचे अनंत अडथळे पार करतच त्याचा प्रवास सुरू होता. पण आता तो अडचणींना कंटाळला होता. जीवनात संघर्षाशिवाय दुसरं काहीच उरलेलं नाही, असं त्याला वाटायचं. म्हणूनच गावात एक साधू आल्याचं कळल्यानंतर त्यांना भेटून अडचणींचा पाढा वाचायचं त्याने ठरवलं. भोला त्यांच्याकडे गेला आणि अडचणींपासून मुक्ती मिळवण्याचा मार्ग सांगण्याची विनंती केली. त्यावर साधू हसले आणि म्हणाले, माझ्यासोबत ये. मी तुला अडचणी सोडवण्याचा उपाय सांगतो. एवढं बोलून साधू त्याला घेऊन नदीकाठी आले. पलीकडे गेल्यावर मी तुला उपाय सांगेन, असं म्हणून ते नदीकाठी उभे राहिले. बराच वेळ होऊनही साधू हलायचं नाव घेत नसल्याचं पाहून भोला अस्वस्थ झाला आणि म्हणाला की, आपण पलीकडे कधी जायचं? त्यावर साधू म्हणाले, नदीचं पाणी पूर्णपणे आटलं की आपण पलीकडे जाऊ. हे ऐकून भोलाने प्रश्नार्थक नजरेने साधूंकडे पाहिलं आणि म्हणाला, नदीचं पाणी आटणार तरी कसं?

भोलाचा प्रश्न ऐकून साधू म्हणाले, 'बाळ, हेच तर तुला समजावून सांगायचं आहे.' जीवन म्हणजे एक नदी आहे. त्यातील समस्या कधीच संपणार नाहीत. त्या आपणच सोडवायच्या असतात. प्रयत्नपूर्वक मार्ग काढायचा असतो. नदीच्या काठी बसून पाणी आटण्याची वाट बघत राहिल्याने हाती काहीही लागणार नाही. अडचणी सोडवायच्या असतील तर हातावर हात ठेवून चालणार नाही, हाच बोध यातून घ्यायला हवा.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. १५, ऑक्टोबर २०२४ ■

# दारुड्या बापाचा सख्ख्या मुलीवरच अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

दारुड्या बापाने सख्ख्या १४ वर्षीय मुलीला जीवे मारण्याची धमकी देऊन बळजबरी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. गेल्या तीन महिन्यांपासून ती मुलगी बापाचा लैंगिक अत्याचार सहन करीत होती. शेवटी आईला प्रकार सांगितल्यानंतर या प्रकरणाला वाचा फुटली. लकडगंज पोलिसांनी तक्रारीवरुन बापाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

आरोपी किसन (बदललेले नाव) हा बेरोजगार असून पत्नी, मुलगी आणि मुलासह लकडगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहतो. तो गेल्या चार वर्षांपासून बेरोजगार असून त्याला दारुचे व्यसन आहे. किसन कामाला जात नसल्यामुळे पत्नी घराबाहेर पडली. ती खासगी काम करुन संसाराचा गाडा हाकते. मुलगी १४ वर्षाची असून ती नवव्या वर्गात तर मुलगा पाचवीत आहे. दारुड्या किसनाची गेल्या काही दिवसांपासून आपल्या सख्ख्या मुलीवर वाईट नजर होती. गेल्या तीन महिन्यांपासून तो तिला बाहुपाशात घेऊन अश्लील चाळे करीत होता. तू आता मोठी झाली आहेस, म्हणून मी तुझा लाड करीत आहे. असे सांगून तो वारंवार तिच्याशी लगट करीत होता. मुलीने बापाच्या या घाणेरड्या कृत्याकडे दुर्लक्ष केले.

मुलगी आंघोळ करुन बाहेर आल्यानंतर तिला कपडे त्याच्यासमोरच कपडे बदलण्याची सक्ती करीत होता. गेल्या काही दिवसांपूर्वी पत्नी नातेवाईकाकडे धार्मिक समारंभासाठी गेली असताना मध्यरात्रीनंतर झोपेत असलेल्या मुलीशी बापाने अश्लील कृत्य केले. शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मुलीने नकार दिला. त्यामुळे तिला बापाने मारहाण केली. त्यानंतर बळजबरी शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

पत्नी कामावर गेल्यानंतर किसन हा मुलाला खेळायला बाहेर पाठवायचा. त्यानंतर मुलीला शारीरिक संबंधाची मागणी करायचा. ती अनेकदा त्याला नकार द्यायची. त्यानंतर तो शिक्षण बंद करण्याची धमकी द्यायचा. तसेच आईला जीवे मारण्याची धमकी द्यायचा. त्यामुळे मुलगी घाबरुन त्याला संबंधासाठी होकार द्यायची. शिक्षण बंद आणि आईच्या जीवाला धोका असल्यामुळे झालेला प्रकार ती आईला सांगत नव्हती.

गेल्या आठवड्यात आई कामावरुन लवकर घरी आल्यानंतर मुलीने पोटात दुखत असल्याचे सांगून रडायला लागली. आईने तिची आस्थेने विचारपूस केल्यानंतर वडिलांनी नुकताच शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे सांगितले. त्यामुळे चिडलेल्या पत्नीने पतीला विचारणा केली. त्याने कबुली दिली आणि पोलिसात गेल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे महिलेने काही नातेवाईकांना घडलेला प्रकार सांगितला. नातेवाईकांनी हिम्मत दिल्यामुळे ती मुलीला घेऊन पोलीस ठाण्यात गेली. लकडगंज पोलिसांनी तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस करीत आहे.

# रामटेकमधून शिंदेंचा उमेदवार जाहीर

## आमदार आशिष जयस्वाल यांची वर्णी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



रामटेक विधानसभा मतदारसंघातील राजकीय परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होत आहे. महायुतीकडून शिवसेना शिंदे गट आणि भाजप तर महाविकास आघाडीकडून काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने या मतदारसंघावर दावा केला आहे. त्यामुळे जागा वाटपाचा पेच निर्माण होणार हे निश्चित असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी पारशिवनी येथील कार्यक्रमात आमदार आशिष जयस्वाल यांची उमेदवारी जाहीर करून आश्चर्याचा धक्का दिला आहे.

राज्यात अजून महायुती वा महाविकास आघाडीचे जागा वाटप निश्चित व्हायचे आहे. आचारसंहीता जाहीर झाल्यानंतर ते जाहीर होवू शकते. असे असताना मुख्यमंत्र्यांनी जयस्वाल यांना रामटेक येथून उमेदवारी जाहीर केली आहे. 2019 मध्ये युतीधमार्चे पालन न करता जयस्वाल यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. यापूर्वी तीनदा ते शिवसेनेकडून निवडून आले होते.

राज्यात महायुतीची सत्ता आल्यानंतर शिवसेना शिंदे गटाला समर्थन देणारे आशिष जयस्वाल सेनेतून बंडखोरी करून निवडून आले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी अतिशय निकटचे संबंध असल्याचा फायदा त्यांना नेहमीच झाला.

महाविकास आघाडीतही रामटेक विधानसभा मतदारसंघावरून वादाची ठिणगी पडू शकते. 2024 लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे श्यामकुमार बर्वे विजयी झाल्यामुळे काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला आहे. काँग्रेसकडून माजी मंत्री राजेंद्र मुळक इच्छुक आहेत. बर्वे यांच्या विजयानंतर झालेल्या आभार सभेत रश्मी बर्वे यांनी मुळक हे रामटेक विधानसभेचे पुढील उमेदवार असल्याचे घोषित केले.

शिवसेनेचे (ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख प्रेम रोडेकर यांनी या घोषणेवर आक्षेप घेतला असून, शिवसेनेचा हा परंपरागत मतदारसंघ असल्याने काँग्रेसने असा दावा करू नये, अशी भूमिका घेतली आहे. ठाकरे गटाकडून विशाल बरबटे इच्छुक आहेत.

यामुळे महाविकास आघाडीत शीतयुद्ध सुरू झाले आहे. जातीय समीकरणांच्या दृष्टीने, रामटेकमध्ये कुणबी, नवबौद्ध, दलित आणि आदिवासी मतदारांचे प्रमाण निर्णायक आहे.

# बॅटरी चोरांची टोळी गजाआड

**नागपूर :** ई रिक्षाच्या बॅटरी चोरी करून त्यांची कवडीमोल भावात विक्री करणाऱ्या टोळीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या. मोहम्मद रिजवान अंसारी (50) रा. यशोधरानगर, मोहम्मद इरफान असलम शेख (38) रा. पाचपावली अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून बारा बॅटरी आणि गुन्ह्यातील चोरी केलेले वाहन जप्त करण्यात आले. आरोपी असलम हा ई रिक्षाची बॅटरी चोरी करण्यात तरबेज आहे. त्याने यापूर्वी सुद्धा बॅटरी चोरी करून त्यांची कवडीमोल भावात विक्री केली आहे. कुठलेच कामधंदा न करता चोरीतून मिळालेल्या पैशांवर तो कुटुंब चालवितो.

मानेवाडा येथील रहिवासी फियार्दी संजय पाटील (45) यांचा ई रिक्षा भाड्याने देण्याचा व्यवसाय आहे. त्यांच्याकडे भरपूर ई रिक्षा आहेत. दिवसभर चालविल्यानंतर रात्री ई रिक्षा त्यांच्या घराजवळ उभ्या असतात. आरोपी असलमने बॅटरी चोरीसाठी इरफानला सोबत घेतले. या दोघांनी मिळून संजय यांच्याकडील 4 आणि इतर ठिकाणाहून बॅटरी चोरी केल्या. चोरीसाठी एक दुचाकीही चोरी केली. चोरीच्या दुचाकीने दोघेही बॅटरी चोरीसाठी निघत होते. संजय यांच्या तक्रारीवरून हुडकेश्वर पोलिसांनी गुन्हा नोंदवत आरोपींचा शोध सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनिय माहितीच्या आधारे आरोपींना हुडकून काढले. त्यांची विचारपूस केली असता बॅटरी चोरीची कबुली दिली.

ही कारवाई पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, पोलिस उपायुक्त रश्मिता राव, पोलिस उपायुक्त विनायक कोते यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ पोलिस निरीक्षक भेदोडकर, पोलिस निरीक्षक नागेशकुमार चातरकर, सपोनि ओमप्रकाश भलावी, दिनेश गाडेकर, चेतन वैद्य, ताराचंद अंबाडरे, संतोष सोनटक्के यांनी केली.

# पालेभाज्यांच्या दरात वाढ

**नागपूर :** आवक कमी झाल्याने कोंबी, फ्लॉवर, हिरवी मिरची, शेवगा, गाजर, घेवडा, ढोबळी मिरची, मटारच्या दरात वाढ झाली. गेल्या आठवड्यात झालेला पाऊस आणि दसऱ्यामुळे फळभाज्यांची आवक कमी झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ३ ते ४ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ ते ३ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून २ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून २ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ४ ते ५ टेम्पो गाजर, कर्नाटक, गुजरातमधून ४ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली. मेथी, शेपू, कांदापात, चाकवत, करडई, चुका, चवळई या पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली. राजगिऱ्याच्या दरात घट झाली असून, कोथिंबिर, पुदीना, अंबाडी, मुळे, पालक या पालेभाज्यांचे दर स्थिर आहे.

# मदन मोडक यांची वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्याला भरघोस देणगी

## एक कोटी अकरा लाखाचा धनादेश सरसंघचालकांकडे सुपूर्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :




रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुखनिवासी मदन वामनराव मोडक व सौ. मंजिरी मदन मोडक यांनी नागपूर येथे वनवासी कल्याण आश्रमासाठी एक कोटी अकरा लाख रुपये देणगीचा धनादेश राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्याकडे सुपूर्त केला.

मोडक हे देवरुख येथील प्रतिष्ठित बागायतदार व सामाजिक कार्यकर्ते असून स्वामी समर्थ सेवक प्रतिष्ठान, देवरुख शिक्षक प्रसारक मंडळ, कोकण मराठी साहित्य परिषद अशा विविध संस्थामध्ये सक्रिय आहेत. त्यांनी उभारलेल्या शहीद जवान स्मारक प्रकल्पाची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली होती. मोडक यांनी स्वतः कल्याण आश्रमाच्या कामाची माहिती घेऊन सदर देणगी कल्याण आश्रमाच्या कामासाठी दिली.

यावेळी झालेल्या एका विशेष समारंभात कल्याण आश्रमाचे राष्ट्रीय अध्यक्ष सत्येंद्र सिंह यांच्यासह मोडक यांच्या दोन्ही कन्या सहपरिवार उपस्थित होत्या. "माझे वडील भारतीय सेनेत होते. त्यांच्याकडून मिळालेल्या संस्कारातून मला ही सेवेची प्रेरणा मिळाली. सामाजिक बांधिलकीतून मी ही मदत करत आहे', असे मोडक यांनी मनोगतातून सांगितले. यावेळी बोलताना कल्याण आश्रमाचे राष्ट्रीय अध्यक्ष सत्येंद्र सिंह यांनी समाजाने सढळ हस्ते मदत करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले.

वनवासी कल्याण आश्रम देशभरातील वनवासी बांधवांच्या विकासासाठी कार्यरत सामाजिक संस्था असून छात्रावास, विद्यालय, एकल विद्यालय, आश्रमशाळा या माध्यमातून जवळपास एक लाख विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य संस्था करीत आहे. संस्थेद्वारा रुग्णालय, आरोग्य केंद्र, आरोग्य शिबिर, ग्राम आरोग्य रक्षक योजनेच्या माध्यमातून लाखो रुग्णांची सेवा केली जाते. अशा या बहुआयामी कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन मोडक यांनी या कामासाठी देणगी दिली आहे.

# गुंतवणुकीच्या नावावर लाखोंचा गंडा

**नागपूर :** भागीदारीत व्यवसाय करण्याची बतावणी करून एका व्यापाऱ्याने नामांकित रुग्णालयातील महाव्यवस्थापकाची 33 लाख रुपयांनी फसवणूक केली. ही घटना सदर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी विकास रामशिरोमणी मिश्रा (47) रा. मोहननगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. श्रीकांत मुरलीधर ठाकरे (50) रा. देवनगर, खामला रोड असे आरोपीचे नाव आहे.

विकास हे किंग्सवे रुग्णालयात महाव्यवस्थापक आहेत. आरोपी श्रीकांत याची धनलक्ष्मी सेल्स कार्पोरेशन व रेडिओ मेंशन नावाने डिस्ट्रिब्यूटर फर्म आहे. गत 10 वर्षांपासून विकास आणि श्रीकांत यांच्यात ओळख होती. श्रीकांत किंग्सवे रुग्णालयात लागणाऱ्या साहित्यांचा पुरवठा करीत होता.

# प्रवासी रेल्वे गाड्यांमध्ये साखळ्या ओढणाऱ्यांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :



रेल्वे सुरक्षा दल, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग रेल्वेमध्ये घडणाऱ्या सर्व प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांना पकडण्यात आणि गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्याच अनुषंगाने, ऑक्टोबर 2024 महीना (11 ऑक्टोबरपर्यंत) रेल्वे संरक्षण दल दक्षिण-पूर्व मध्य रेल्वे, नागपूर मार्फत प्रवासी वाहनांमध्ये बेकायदेशीरपणे साखळी ओढणाऱ्यांना अटक करून त्यांच्यावर कारवाई करण्याची सतत मोहीम राबविण्यात येत आहे.

विभाग रेल्वेने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेदरम्यान, योग्य व पुरेशा कारणाशिवाय बेकायदेशीरपणे चेन पुलिंग करणाऱ्या व्यक्तींवर रेल्वे कायद्याच्या कलम 141 अन्वये एकूण 655 गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण 634 जणांना अटक करण्यात आली असून, माननीय रेल्वेने कायदेशीर कारवाई केली आहे. न्यायालयासमोर हजर केले असता एकूण रु. 273295/- दंड भरून रेल्वे निधीत जमा करण्यात आला. रेल्वे संरक्षण दल, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग, सर्वसामान्य जनतेला आणि सर्व सन्माननीय नागरिकांना प्रवासा दरम्यान अनाधिकृत/ विनाकारण साखळी ओढू नये, असे आवाहन करते, कारण गाड्यांच्या वाहतुकीत व्यत्यय आल्याने इतर प्रवाशांना समस्यांना सामोरे जावे लागते. रेल्वे वाहतुकीतील व्यत्यय आणि विलंब कमी करण्यासाठी नागपूर विभागाकडून सर्व सकारात्मक पावले उचलली जात आहेत आणि अनधिकृत/अवास्तव चेन पुल करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जात आहे.

# श्री माहेश्वरी युवक संघ सार्वजनिक दवाखान्यात स्वयंचलित हार्मोन ॲनालायझर मशीनचे उद्घाटन

## मालचंद दिलीप बिहाणी चॅरिटेबल फाऊंडेशन तर्फे अनुदान म्हणून दिली मशीन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



श्री माहेश्वरी युवक संघ सार्वजनिक रुग्णालयातील श्री भंवरलालजी मालू स्मृती पॅथॉलॉजी विभागात विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर "मींडर" ब्रँडच्या स्वयंचलित हार्मोन विश्लेषक मशीनचे उद्घाटन करण्यात आले.

मालचंद दिलीप बिहाणी चॅरिटेबल फाऊंडेशन तर्फे अनुदान म्हणून मिळालेल्या या मशीनचे प्रतिष्ठानचे संचालक दिलीप बिहाणी यांच्या हस्ते विधिवत पूजन करून प्रतिष्ठापना करण्यात आली. माजी अध्यक्ष सतीश बियाणी यांनी या यंत्राची उभारणी यशस्वी करण्यासाठी पूर्ण निस्वार्थ प्रयत्न केले. संस्थेचे अध्यक्ष महेश एम. बजाज, सचिव मुकुंद दरक, प्रकल्प प्रभारी पवन बजाज आणि निमंत्रक सुमित चांडक यांनी शपथ घेतली की, सार्वजनिक दवाखान्यात इतर सेवांप्रमाणेच पॅथॉलॉजी क्षेत्रातील सर्व अत्याधुनिक सुविधा कमी शुल्कात उपलब्ध करून दिल्या जातील.

नागपुरातील सर्व नागरिक याचा लाभ घेऊ शकतात. इतवारी येथील निकलस मंदिर रोड येथे असलेल्या उपरोक्त दवाखान्यात फिजिओथेरपी, दंत, नेत्र, विविध ओपीडी व पॅथॉलॉजीच्या सुविधा नाममात्र शुल्कात उपलब्ध करून दिल्या जातात याची नोंद घ्यावी.

हे मशीन बसवल्यानंतर या दवाखान्यात पॅथॉलॉजी क्षेत्रातील अत्याधुनिक सुविधाही उपलब्ध होणार आहेत. श्यामसुंदर सोनी, शरदजी सोनी, ब्रिजगोपाल दरक, सतीश बियाणी, कमल तापडिया, गिरधर चांडक, गोविंद पसारी, सोनल सारडा, भावनाजी सोमाणी, संगीता बियाणी, अंशु काबरा, डॉ. मधुसूदन सारडा, या नवीन मशीनच्या प्रतिष्ठापना समारंभात ठळकपणे उपस्थित होते. दसऱ्याच्या दिवशी राजेशजी काबरा, दामोदर तोष्णीवाल, राधेश्याम सोनी, सुधीर सोनी, अनिल पी. सारडा, आनंद पी. सारडा, कृष्णाजी सारडा, शुभम भूतडा, गौरव काबरा, मुकेश अग्रवाल, सुनील अग्रवाल, डॉ. राजेश उपस्थित होते. फक्त मानवजातीची सेवा करणे, वरील माहिती प्रकल्प समन्वयक सुमित चांडक यांनी दिली.



नागपूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरच्या दीक्षाभूमिवर बौद्ध धर्माची दिक्षा घेतली ती तारीख होती. १४ ऑक्टोबर १९५६ मध्ये त्या दिवशी विजयादशमी असल्याने दीक्षाभूमिवर दसऱ्याच्या दिवशी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जात असला तरी तारखेनुसार १४ ऑक्टोबर रोजीही हजारो अनुयायी येथे अभिवादन करण्यासाठी येतात. आज सोमवार १४ ऑक्टोबर रोजी दीक्षाभूमिवर येणाऱ्यांची संख्या लक्षणीय होती.

# हरीश देशमुख, उद्धव साबळे, रमेश लखमापुरे व रुपेश पवार यांना स्मिता-स्मृती-२०२४ पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :






विदर्भ गौरव प्रतिष्ठान, नागपूरच्या वतीने दरवर्षी प्रतिभासंपन्न अभिनेत्री पद्मश्री स्व. स्मिता पाटील हिच्या स्मृतिप्रीत्यर्थ सामाजिक आणि रंगभूमीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विदभार्तील प्रत्येकी एका व्यक्तीला रोख रुपये एकवीस हजार, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे स्वरूप असलेला 'स्मिता स्मृती पुरस्कार देऊन गौरविले जाते.

"स्मिता स्मृती-२०२४' चे सामाजिक कार्याचा पुरस्कार अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याचा ध्यास वयाच्या ७ व्या वर्षापासुन घेत, जादूटोणा विरोधी कायद्याचा प्रचार-प्रसार करून शासकीय कार्यात मदत करणारे, अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय महासचिव हरीश देशमुख यांना देण्यात आला.

तसेच"रोजगार संघ' या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून आजवर १५० गावांमध्ये ग्राम विकासाचे कार्य करणारे, रोजगार संघाचे सरचिटणीस व इंडियन इन्स्टिट्युट ऑफ युथ वेलफेअर, नागपूरचे प्रकल्प अधिकारी उद्धव साबळे यांना तसेच रंगभूमीचा पुरस्कार मागील ३६ वर्षांपासून रंगभूमीवर उल्लेखनीय कार्य करणारे, रंगभूमीवर अनेक आव्हानात्मक भूमिका साकारणारे प्रसिद्ध दिग्दर्शक, नेपथ्यकार, प्रकाश योजनाकार रमेश लखमापुरे यांना व मागील २२ वर्षांपासून राष्ट्रभाषा परिवार बॅनरखाली रंगभूमीचे कार्य करणारे, नाट्य दिग्दर्शक, नाट्य लेखक व नाट्य कायार्शाळा प्रशिक्षक व तसेच रंगभूमीवरील उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त रूपेश पवार यांना देण्यात येणार आहे. हा पुरस्कार समारंभ पद्मश्री स्व. स्मिता पाटील हिच्या स्मृतिदिनी दि.१४ डिसेंबर, २०२४ रोजी संपन्न करण्याचा मानस आहे.

# प्रा. लेकुरवाळे यांच्या नेतृत्वात रोजगार मेळावा

■ महासागर प्रतिनिधी
कामठी दि. १४ :




मौदा विधानसभा मतदारसंघात प्रा. अवंतिका लेकुरवाळे यांच्याद्वारे आयोजित भव्य रोजगार मेळावा पार पडला. युवकांना आपल्या गावाच्या ठिकाणी हक्काचा रोजगार मिळावा यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे होते. या मेळाव्यात एकूण ६० नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला, ज्याद्वारे ८०० युवकांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगार उपलब्ध झाले आहेत.

रोजगार मेळाव्यात सहभागी कंपन्यांनी युवकांच्या विविध पदांसाठी पदासाठी मुलाखती घेतल्या, आणि त्याच ठिकाणी लगेच नियुक्ती पत्र देवू केले. हजारो युवक या मेळाव्यात उत्साहात सहभागी झाले होते. ग्रामीण आणि नागरी भागातील युवकांना आपल्या घराजवळ हक्काचा रोजगार मिळावा, ज्यामुळे स्थलांतर कमी होईल आणि त्यांच्या कौशल्यांना योग्य संधी मिळेल या मुख्य उद्देश प्रा. अवंतिका लेकुरवाळे यांचा होता.

या मेळाव्याचे उद्घाटन माजी मंत्री लोकनेता सुनील केदार, रामटेक लोकसभेचे खासदार श्यामकुमार बर्वे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या मेळाव्यात प्रामुख्याने माजी अध्यक्ष रश्मीताई बर्वे, पं.स. कामठी सभापती दिशाताई चनकापुरे, पं. स. मौदा सभापती उपसभापती दिलीपजी वंजारी, प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे शकुरजी नागानी, माजी नगराध्यक्ष शाहजाह खान, मनोज शर्मा, माजी नगराध्यक्ष निरज यादव, जि. प. सदस्य वृंदाताई नागपुरे, कॉंग्रेस कमिटी मौदा तालुका ज्ञानेश्वरजी वानखेडे, कृ. ऊ. बा. समिती मौदा सभापती राजेश ठवकर राजेंद्र लांडे नीरज यादव आशिष मल्लेवर सोनूताई कुथे रोशन खडसे सचिन मानवटकर रतनदीप रंगारी आकाश उके अर्चना मंडपे सुमेध मानवटकर अजय राऊत, हरिभाऊ गाडबैल, कमलेश नांदुरकर आदी उपस्थित होते.



# दवलामेटी तालुका क्रिडा संकुलात मल्टीगेम सभागृहाचे भुमिपुजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

दवलामेटी येथील तालुका क्रिडा संकुलात महाराष्ट्र शासन क्रिडा विभाग नागपूर अंतर्गत मल्टीगेम सभागृहाचे भुमिपुजन आमदार समीर मेघे व जिल्हा क्रिडा अधिकारी पल्लवी धात्रक यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोबतच कार्यालयीन ईमारत संरक्षण भिंत, विविध खेळाची मैदान तयार करणे या कामासाठी एकूण २७० लक्ष रुपये विकास कामाचे भुमिपुजन करण्यात आले.

यावेळी सरपंच गजानन रामेकर, उपसरपंच अर्चना चौधरी, ग्रा.पं. सदस्य छाया खिल्लारे, सतिश खोब्रागडे, सुनिल दुबे, रोशन बिडवाईक, चांगदेव चरडे, स्नेहा बिडवाईक, वैशाली रामेकर, भगवती वर्मा, वैशाली मुधोळकर, कविता चरडे, रेखा कोडापे, कमल पेंदाम, रमेश गोमासे, छत्रपती शेंदरे सुशिल बावणे, नितिन अडसड, लक्ष्मण ईटकर, सचिन खिल्लारे, विलास हरले, चांगदेव चरडे, मांडवगडे, संजय ईटकर अंगणवाडी सेविका उषा चारभे, इंदिरा बलवीर, शोभा मानकर, नलिनी मेश्राम उपस्थित होते.

# मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे अखंडित प्रवास व सेवा सुनिश्चित



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या भव्य प्रमाणात मध्य रेल्वे नागपूर विभागाने चार दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या १,८०,००० हून अधिक भाविकांसाठी अखंड प्रवास आणि सोयीची यशस्वीपणे सोय केली. विशेषतः नियमित रेल्वे वाहतुकीसाठी अजनी स्थानक तात्पुरते बंद केल्यामुळे सुरळीत कामकाज आणि प्रवाशांची सोय सुनिश्चित करण्यासाठी विभागाने अनेक उपाययोजना अंमलात आणल्या.

1. **विशेष ट्रेन सेवाः** कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या भाविकांच्या प्रचंड गदीर्ची पूर्तता करण्यासाठी पंधरा विशेष गाड्या सुरू करण्यात आल्या. विशेष गाड्यांनी प्रवाशांना त्रासमुक्त प्रवास, वक्तशीरपणा आणि आरामाची खात्री दिली.

2. **बस शटल सेवाः** अजनी स्थानक बंद झाल्याने प्रवासातील आव्हाने समजून घेऊन, विभागाने अजनी आणि नागपूर स्थानकांदरम्यान समर्पित बस सेवांची व्यवस्था केली. 2000 हून अधिक भाविकांच्या वाहतुकीच्या गरजा प्रभावीपणे पूर्ण करून प्रवाशांची वाहतूक करण्यासाठी दररोज 60 हून अधिक बस फेऱ्या चालवण्यात आल्या.

3. **व्यापक प्रसिद्धीः** प्रवाशांना मार्गदर्शन आणि माहिती देण्यासाठी, 100 हून अधिक बॅनर आणि 25 मोठे होर्डिंग्स नागपुरातील महत्त्वाच्या ठिकाणी धोरणात्मकरीत्या लावण्यात आले होते, ज्यात रेल्वेच्या वेळा आणि वाहतूक निर्बंध इत्यादीसारख्या विशेष व्यवस्थांबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या होत्या आणि आवश्यक माहिती प्रदान केली होती.

4. **मजबूत स्टाफिंगः** प्रवाशांचा प्रवाह व्यवस्थापित करण्यासाठी आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी व्यावसायिक आणि रेल्वे संरक्षण दल संघातील 500 हून अधिक अतिरिक्त कर्मचारी तैनात करण्यात आले होते. या कर्मचाऱ्यांनी संपूर्ण कार्यक्रमात पाठिंबा देण्यासाठी आणि सुव्यवस्था राखण्यासाठी चोवीस तास काम केले.

5. **ऑन-ग्राउंड पर्यवेक्षणः** नागपूर विभागाचे अधिकारी 24/7 कर्तव्यावर होते, कामकाजाच्या सुरळीत संचालनावर देखरेख करत होते आणि कार्यक्रमादरम्यान उद्भवलेल्या कोणत्याही आव्हानांचे निराकरण करत होते. साइटवर त्याच्या उपस्थितीने हे सुनिश्चित केले की सर्वकाही वेळेवर आणि कार्यक्षमतेने चालले. मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाच्या काळजीपूर्वक नियोजन आणि अंमलबजावणीमुळे या महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी नागपुरात येणाऱ्या हजारो भाविकांना अखंड अनुभव मिळाला. सुरक्षितता आणि कार्यक्षमता राखून होणारा मेळावा हाताळण्याची विभागाची क्षमता ही प्रवासी सेवेसाठीच्या त्याच्या बांधिलकीचा पुरावा आहे.

# माजी आमदार आनंदराव देशमुख यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १४ :



राष्ट्रीय आदर्श विद्यालय शिक्षण मंडळ रामटेकचे अध्यक्ष व माजी आमदार आनंदराव देशमुख यांचा ८३ वा वाढदिवस १० ऑक्टोबरला आनंद विला रामटेक येथे उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त सर्व स्तरातून त्यांच्या चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ कला महाविद्यालय नवेगाव खैरी तर्फे आनंदरावजी देशमुख यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ प्रदान करून अभिष्टचिंतनासह गौरव करण्यात आला. वाढदिवसानिमित्त शाळेच्या विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले.

यावेळी माजी मंत्री तथा कांग्रेस चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक, राष्ट्रीय आदर्श शिक्षण मंडळाचे सचिव मयंकराव देशमुख, कोषाध्यक्ष अंशुल देशमुख, संचालक होमराज हजारे, सामाजिक कार्यकर्ते रमेश कारामोरे, मुख्याध्यापक रवींद्र चन्ने, शाळेचे शिक्षक साक्षोधन कडबे, दिलीप पवार, प्रा. अरविंद दुनेदार, सतीश जुननकर, अमित मेश्राम, शैलेंद्र देशमुख, रितेश मैंद, प्रा. मोहना वाघ, अर्चना येरखेडे, राजीव तांदूळकर, फजितराव कोरडे, शिपाई राशिद शेख तसेच विविध स्तरातून बहुसंख्य चाहते उपस्थित होते.

# ऑटो डीलरच्या कार्यालयात ८.४० लाखांची चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

अज्ञात आरोपींनी एका ऑटो डीलरचे कार्यालय फोडून 8.40 लाख रुपयांची रोकड चोरून नेली. ही घटना नंदनवन ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी मोहम्मद खुर्शिद मोहम्मद नईम अंसारी (38) रा. शांती लेआऊटच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. खुर्शिद यांच्या घरीच पुढच्या भागात सोफिया ऑटोडील नावाने कार्यालय आहे. गुरूवारी रात्री 10 वाजताच्या सुमारास त्यांनी कार्यालय बंद केले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपींनी शटरचे कुलूप तोडून त्यांच्या कार्यालयात प्रवेश केला. कपाटाच्या ड्राव्हरमध्ये ठेवलेली 8 लाख 40 हजार रुपयांची रोकड चोरी करून पसार झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी खुर्शिद यांचा शटरचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी आत जाऊन पाहिले असता कपाटातील रोकड गायब होती. त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. नंदनवन पोलिस घटनास्थळी पोहोचले. कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता मध्यरात्री 2 च्या सुमारास दोन आरोपी कार्यालयात घुसताना दिसत आहेत. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदविला. पुढील तपास सुरु आहे.

## देशी कट्टा घेऊन फिरताना मिळाला तरुण

**नागपूर :** कपिलनगर पोलिसांनी गस्तीदरम्यान एका तरुणाला देशीकट्टा घेऊन फिरताना पकडले. शेख अरबाज शेख अलीम (21) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. शनिवारी सकाळी 8 वाजताच्या सुमारास कपिलनगर ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत होते. सम्राट अशोकनगर परिसरात चर्चजवळ पोलिसांना अरबाज हा संशयास्पदरित्या फिरताना दिसला. पोलिसांना पाहताच त्याने पळ काढला. झडतीमध्ये अरबाजजवळ देशीकट्टा मिळाला. त्याने पॅन्टमध्ये कट्टा लपवून ठेवलेला होता. पोलिसांनी कट्टा जप्त करून अरबाजविरुद्ध आर्म्स ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. त्याने कट्टा कुठून खरेदी केला आणि परिसरात शस्त्र घेऊन फिरण्यामागचे कारण काय याचा शोध घेतला जात आहे.

# बसपाकडून निःशुल्क पुस्तके वितरित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या 68 व्या वर्धापन दिना निमित्ताने दीक्षाभूमीवर बहुजन समाज पार्टीने बाबासाहेब आंबेडकरांनी 1956 ला दीक्षाभूमीवर दिलेले भाषण तसेच मायावतींनी धम्मदीक्षेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त 14 ऑक्टोंबर 2006 ला नागपुरात दिलेले भाषण यांची 5 हजार संयुक्त पुस्तिका तसेच लहान मुलांच्या शालेय वस्तू दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांना निशुल्क वितरीत करण्यात आली.

याप्रसंगी प्रामुख्याने महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, बसपाचे माजी मंत्री यशवंत निकोसे, जिल्हाध्यक्ष योगेश लांजेवार, जिल्हा प्रभारी रंजनाताई ढोरे, राजकुमार बोरकर, माजी जिल्हा प्रभारी राहुल सोनटक्के, माजी जिल्हाध्यक्ष संदीप मेश्राम, अनोमदर्शी भैसारे (वर्धा), महासचिव चंद्रशेखर कांबळे, मिलिंद वासनिक, महिला नेत्या सुनंदा नितनवरे, अभिलेष वाहाने, सुशील वासनिक (चंद्रपूर), युवानेते सदानंद जामगडे, अंकित थुल, सचिन मानवटकर, प्रवीण पाटील, भानुदास ढोरे, वर्षा सहारे, नितीन वंजारी, अरुण शेवडे, जगदीश गेडाम, प्रकाश फुले, वीरेंद्र कापसे, बालचंद्र जगताप, मनोज गजभीये, राकेश सहारे, कुणाल शेवडे, विद्यार्थी शेवडे, प्रिया कांबळे व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# कराटे स्पर्धेत सच्चिदानंद बनसोडला सुवर्णपदक

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :



भिडे गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये नुकतीच तिसरी राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा शक्ती कराटे स्पोर्ट्सतर्फे आयोजित करण्यात आली होती. यात दवलामेटी परिसरातील सच्चिदानंद विकास बनसोड हा सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. त्याने काता प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त केले. लाव्हा परिसरातील सरोजनी पब्लिक शाळेतील इयत्ता दुसरीचा विद्यार्थी आहे.

कुरुक्षेत्र येथे नॅशनल कराटे स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करीत सुवर्ण पदक, डिफेन्सतर्फे झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत, सुवर्ण पदक, गतवर्षी वर्धेत झालेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्य पदक मिळाले होते.

तो आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व प्रशिक्षक विनोद गुप्ता, लेखराज किंताली, मुख्याध्यापक व शिक्षकवृंदांना देतो.

# डेस्क बेंचचे उद्घाटन आणि हस्तांतर कार्यक्रम संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



आयडीबीआय बँकेच्या हीरक महोत्सवी समारंभाचा एक भाग म्हणून, महानगर पालिकेच्या जी.एम. बनाटवाला इंग्रजी उच्च प्राथमिक शाळेमध्ये डेस्क बेंचचे उद्घाटन आणि सुपूर्द केले, आज हा उपक्रम आयडीबीआय बँकेच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (उरफ) कार्यक्रम अंतर्गत सह्याद्री फाउंडेशनच्या एनजीओ च्या सहकार्याने आयोजित करण्यात आला, शासकिय शाळामध्ये वंचित विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

आयडीबीआय बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक आणि झोनल ऑफिसर, श्रीकांत तिरपुडे यांचे हस्ते हा कार्यक्रम घेण्यात घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनपा चे शिक्षण विभागाचे संयोजक भारत गोसावी होते.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती अखिलेश मिश्रा, आयडीबीआय बँकेचे उप विभागीय प्रमुख, अनुराग सिंग, प्रादेशिक अधिकारी, वाय. प्रताप कुमार, उपमहाव्यवस्थापक, आयडीबीआय बँक, गिरीश गुबरे, सहायक महाव्यवस्थापक, आणि जी एम बनटवाला उच्च प्रायमरी शाळेच्या प्राचार्या ममता प्रजापती, हायस्कूल चे प्राचार्य संकुलावर व इंचार्ज शिक्षिका मलिंदर कौर लांबा उपस्थित होते.

तसेच सह्याद्री फाउंडेशनचे संचालक विजय क्षीरसागर, विकास पाटील, धीरज उमाटे, सृष्टी पुनपसागर, सावित्री ठेंगे, संदीप वासनिक, हेमंत पांढराम, सतीश माटे या समारंभाला उपस्थित होते. श्रीकांत तीरपुडे यांनी आयडीबीआय बँकेच्या उरफ उपक्रमांतर्गत शालेय पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी च्या उपक्रमाबाबत माहिती दिली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शिकण्याची परिस्थिती सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. आयडीबीआय बँकेचे उपक्रम, विशेषतः शिक्षण आणि पायाभूत सुविधांवर केंद्रित असलेले, वंचित विद्यार्थ्यांना उत्तम संसाधने आणि सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या शिकण्याच्या अनुभवावर सकारात्मक प्रभाव पाडणे हे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाचा शाळेच्च्या विद्यार्थ्यांना फायदा होईल अशी अपेक्षा भारत गोसावी यांनी व्यक्त केली. कार्यक्रमांचे प्रास्ताविक विजय क्षिरसागर यांनी, कार्यक्रम संचालन शिक्षिका उषा सिंह व आभार प्रदर्शन ममता प्रजापती यांनी केले.

# रामटेक येथे ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १४ :



६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दि.१४ ऑक्टोंबर ला शनिवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक रामटेक येथे परमपुज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरणाकृत पुतड्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच वैशाली नगर, परसोडा, कल्याणमित्र बुध्द विहार तसेच विविध ठिकानी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, परिवर्तन दिन चिराई हो असा जयघोष करण्यात आला.

यावेळी रिऑन हॉस्पीटल चे संचालक डॉ.प्रदीप बोरकर, उच्च न्यायालयाचे अधिवक्ता ॲड.प्रफुल्ल अंबादे, आम्ही भारतीय अभियान चे साक्षोधन कडबे, नितीन भैसारे,राकेश साखरे, अमित अंबादे, राजेश सांगोडे, क्रुणाल धमगाये ,बंडु चौव्हान, दिपराज भोवते, रवी धमगाये, कृपासागर भोवते, ओमकार खोब्रागडे, प्रा.राजेंद्र कामडे, प्रा.रोशन अलोने, राहुल जोहरे, भाऊराव भिलावे, चंद्रशेखर सांगोडे, मनोहर धमगाये,देविदास साखरे,अनिल डोंगरे सह आदी प्रामुख्याने उपस्थीत होते.

# बेसा - पिपळा नगरपंचायत मध्ये व्यवसाय परवाना देण्यासाठी होणार सर्व्हेक्षण

■ महासागर प्रतिनिधी
बेसा, दि. १४ :



## व्यवसाय प्रमाणपत्र न घेणाऱ्यावर होणार कार्यवाही

शहरामध्ये सर्व व्यवसायिकांनी व्यवसाय करण्यासाठी परवाना प्रमाणपत्र घेऊनच व्यवसाय करणे आवश्यक आहे. नगरपंचायत ११ ऑक्टोंबर पासून सर्वे सुरू करणार आहे व सर्वांना व्यवसाय प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. जे व्यवसायिक परवाना प्रमाणपत्र घेणार नाही अशा विरुद्ध कारवाई करण्यात येईल.

**भारत नंदनवार, मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपंचायत बेसा पिपळा**

नगरपंचायत बेसा - पिपळा क्षेत्रातील व्यवसाय करणाऱ्या व्यापारांकडे व्यवसाय परवाना प्रमाणपत्र असणे अत्यंत आवश्यक आहे. शहरात मोठ्या प्रमाणामध्ये विनापरवानाच व्यवसाय सुरू आहे. त्याच्या आर्थिक फटका नगरपंचायत ला बसत आहे.

नगरपंचायत बेसा - पिपळा यांनी प्रशासकीय ठराव पारित करून दर निश्चिती करण्यात आली आहे. व्यवसाय प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता ११ ऑक्टोंबर पासुन शहरात एक खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण सुरू करण्यात येत आहे. सर्वात मोठ्या प्रमाणामध्ये लहान - मोठे व्यवसायिक आहेत. या व्यवसायिकांना व्यवसाय करण्यासाठी नगरपंचायतच्या व्यवसाय प्रमाणपत्राची गरज आहे. परंतु अनेक व्यावसायिक नगरपंचायतच्या व्यवसाय परवाना विना आपला व्यवसाय सुरू ठेवून नगरपंचायत चे उत्पन्न बुडवीत आहेत.

नगरपंचायतची आर्थिक स्थिती डबघाईला असल्यामुळे त्याचा परिणाम प्रशासनावर होत आहे. यासंदर्भात शहरात व्यवसायिकाचे संरक्षण करण्यासाठी सिक्स जी गव्हर्नन्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेला काम देण्यात आले आहे. आता या संस्थेमार्फत व्यवसायिकांना परवाना प्रमाणपत्र देण्यासाठी संपूर्ण प्रक्रिया राबविण्यासाठी सर्वेक्षण सुरू करण्यात येत आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर मुख्य कार्यालयात विहित शुल्क आकारून व्यवसाय प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

# प्रा. संजय ढोबळे यांना
# "स्व. धरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार"

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
स्व. धरणीधर गांधी यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील एका लहान गावात शेतकरी कुटुंबात झाला. कुटुंबात शेती हाच व्यवसाय असल्यामुळे आणि शिक्षणाची व्यवस्था नसल्यामुळे नागपूर येथे मॉडिल मील मध्ये त्यांनी नोकरी पत्करली. कुटुंबाचा संस्कार गांधी, विनोबांच्या विचारांचा प्रभाव व शिक्षणाची आवड असल्यामुळे त्यांनी नोकरी करतानाच बी. कॉम. व पुढे एम. कॉमची पदवी प्राप्त केली.

ते सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. हे सर्व करीत असताना त्यांनी सामाजिक बांधिलकी कायम ठेवली. ५ फेब्रुवारी हा त्यांचा स्मृतिदिवस, या निमित्ताने जे प्राध्यापक उत्तम पद्धतीने विद्यादान



करीत असतानाच सामाजिक बांधिलकी स्वीकारून समाज प्रबोधनाचे काम करीत असतील त्यांना दरवर्षी एक लक्ष रुपये शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

२०२५ चा "स्वधरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार" मा.प्रा. संजय ढोबळे यांना देण्यात येणार आहे. डॉ. संजय ढोबळे हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात वरीष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. संजय ढोबळे यांचा पदवी व पदव्युत्तर स्तरावर सुमारे ३१ वर्षांचा अध्ययनाचा व ३० वर्षांचा संशोधनाचा अनुभव आहे. विविध व्याख्याने, सेमिनार व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी मार्गदर्शन केले आहे. शैक्षणिक सहकार्यासाठी परदेशवारी करून त्यांनी ज्ञानदान केले आहे. जवळपास ९५० शोधप्रबंध प्रकाशित असून ३० आंतरराष्ट्रीय पुस्तकांचे ते संपादित लेखक आहेत.

डॉ. ढोबळे यांनी ७० पेटंट प्रकाशित केले आहेत. अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित असून अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या टीमने प्रकाशित केलेल्या टीमच्या प्रतिष्ठित यादीत जगातील टॉप २% वैज्ञानिकांमध्ये त्यांचा गौरवाने उल्लेख केला आहे.

आतापर्यंत हा पुरस्कार प्रा. आलोक शेवडे, डॉ कुमार शास्त्री, डॉ, संध्या पवार, सौ. सुषमा रमेश मानकर (फुलारी), डॉ, दिलीप पेशवे यांना देऊन सन्मानित केले आहे. हा पुरस्कार स्व धरणीधर गांधी यांच्या स्मृतीदिनी ५ फेब्रुवारी रोजी समारंभपूर्वक प्रदान करण्यात येत असतो.

## जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट

**नागपूर :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून थांबलेला परतीचा पाऊस आता पुन्हा सुरू झाला आहे. भारतीय हवामान खात्याने आज, सोमवारी राज्याच्या अनेक भागात पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. रविवारी देखील राज्यातील अनेक भागात पाऊस झाला, तर विदर्भात मात्र तापमान ४६ अंश सेल्सिअस पलीकडे गेले. दरम्यान, हवामान खात्याने आज पावसाचा इशारा दिल्याने उकाड्यापासून सुटका होण्याची शक्यता आहे. विशेषकरून कोकणात आज मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर मुंबईत देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्रात उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्र येथे तुरळक ठिकाणी वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## घरफोडीचे आरोपी गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट 3च्या पथकाने तांत्रिक तपास आणि खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर कळमना ठाण्यांतर्गत घरफोडीचा छळा लावून दोन आरोपींना अटक केली. चौकशीत आरोपींकडून दोन गुन्हे उघडकीस आले.

त्यांच्याकडून चोरीचा 1.69 लाख रुपयांचा मालही जप्त करण्यात आला. निकेश बलराज शाहू (22) रा. कुंदनलाल गुप्तानगर आणि नीलेश उर्फ बारिक गुलाब धार्मिक (21) रा. वनदेवीनगर, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. कळमना परिसरात राहणाऱ्या फियार्दी निर्मला रोशन पोटभरे (73) गत 23 सप्टेंबर रोजी घराला कुलूप लावून कुटुंबासह गोधनी येथे गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून सोन्याचांदीच्या दागिन्यांसह 37,500 रुपयांचा माल चोरून नेला. घरी परतल्यावर ही घटना उघडकीस आली आणि त्यांनी कळमना पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. गुन्हे शाखा युनिट 3 चे पथकही या गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते. सीसीटीव्ही फुटेज आणि खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी निकेश याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने बारिकसोबत मिळून चोरी केल्याचे कबूल केले. पोलिसांनी बारिकचा शोध घेऊन त्यालाही ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपींनी यशोधरानगर ठाण्यांतर्गतही एक घरफोडी केल्याची माहिती दिली. पुढील तपास सुरु आहे.

## स्टेट बोर्डाच्या परीक्षा केंद्रावर बसवण्यात येणार सीसीटीव्ही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने बारावीची परीक्षा दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दिसऱ्या आठवड्यात घेतली जाते. तर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र म्हणजे दहावीची परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवड्यात घेतली जाते. तर परीक्षांचा ऑनलाईन निकाल मे अखेरीस आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यात येतो. यंदा दहावी आणि बारावीची परीक्षा देणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. बोर्डाने आपल्या परीक्षा पद्धतीमध्ये मोठा बदल केला आहे.

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी त्याचबरोबर विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आतापर्यंत अनेक वेळा सीसीटीव्ही बसवा आणि त्याचे स्टोरेज करण्याची चांगली क्षमता असावी अशा सूचना शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना वारंवार देण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रावर आता सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहे.

राज्यातील अनेक परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही बसविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे ही परिस्थिती पाहता आता सीबीएसई बोर्डाच्या धरतीवर फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात होणाऱ्या बोर्डाच्या परीक्षेसाठी सीसीटीव्ही बंधनकारक



करण्यात आले आहे. ज्या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही नसतील, त्यांचे परीक्षा केंद्रच रद्द होणार आहे. परीक्षा केंद्र कायम ठेवायचे असल्यास सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य करण्यात आल्याची माहिती आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा लवकरच होणार आहेत. तर शाळांसाठीही आता बोर्डाने अनेक सूचना जाहीर केल्या आहेत.

**ग्रामीण परीक्षा केंद्रातील गैरप्रकार**

* राज्यात इयत्ता दहावी आणि बारावीमध्ये विद्यार्थ्यांना कॉपी करून उत्तीर्ण करून देणारी परीक्षा केंद्र उदायास आली आहेत.
* ग्रामीण भागात अशा परीक्षा केंद्रांची संख्या मोठी असते.
* या अडवळणाच्या केंद्रावर राज्यातील अनेक विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी खास येतात.
* साधी रिक्षा सुद्धा न येणाऱ्या या गावांमध्ये परीक्षेच्या काळात लाखोच्या कार उभ्या असतात.
* या ठिकाणी विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी खास व्यवस्था करण्यात आलेली असते. आता अशा परीक्षा केंद्रावर सीसीटीव्हीची नजर राहणार आहे.

## डॉ. के. सिवन यांच्या भेटीने हरखले विद्यार्थी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
भारताच्या अवकाश क्षेत्रातील अत्यंत यशस्वी अशा चांद्रयान मोहिमेचे नेतृत्व केलेले भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) माजी अध्यक्ष डॉ. के. सिवन यांच्या भेटीने प्रा. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीतील विद्यार्थी हरखून गेले. त्यांचा ऑटोग्राफ घेण्यासाठी, त्यांच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी आणि त्यांच्यासोबत फोटो काढून घेण्यासाठी विदयार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता.




प्रा. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीला दिली भेट

प्रसंग होता, प्रा. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरी, धरमपेठ येथील ख्यातनाम भारतीय शास्त्रज्ञांच्या गॅलरीचे उद्घाटन शुक्रवारी डॉ. के. सिवन यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला उपस्थित धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, प्रा. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीचे अध्यक्ष हेमंत चाफले यांच्या हस्ते डॉ. सिवन यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. भविष्यातील शास्त्रज्ञ घडवणा-या प्रा. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीचे कौतुक करताना डॉ. सिवन यांनी त्यांच्या गतकाळातील आठवणींना उजाळा दिला.

विदयार्थ्यांना संबोधित करताना डॉ. सिवन म्हणाले, संशोधन क्षेत्रात जर तुम्हाला यायचे असेल तर आऊट ऑफ द बॉक्स विचार करा. पालक, शिक्षकांचे न ऐकता तुमच्या कल्पनांवर काम करा. कुणालाही फॉलो न करता तुमच्या स्वतःच्या क्षमता ओळखा आणि जे क्षेत्र निवडाल त्यात उत्कृष्ट कार्य करा. स्वतःचे तंत्रज्ञान विकसीत करा आणि इस्त्रोसारख्या सारख्या संस्थामध्ये जाण्यापेक्षा स्वतःचे स्टार्टअप सुरू करा, असा सल्ला त्यांनी दिला.

एका विदयार्थ्याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. सिवन म्हणाले, अपयश हे कधीच वाईट नसते. अपयश नव्या गोष्टी शिकवण्याची संधी देते. फेल या इंग्रजी शब्दाला अर्थ फर्स्ट अटेम्प्ट टू लर्निंग असा असून हे अपयश यशाची पहिली पायरी आहे. त्यामुळे अपयशाला घाबरू नका, असाही सल्ला त्यांनी विदयार्थ्यांना दिला.

प्रा. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीच्या संचालक डॉ. सीमा उबाळे यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाला धरमपेठ शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, एक्सप्लोरेटरीचे पदाधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व विविध शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## कृषी सेवा परीक्षेच्या उमेदवारांना अखेर मिळाले नियुक्ती पत्र

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेतून ४१७ उमेदवारांची निवड झाली. या उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे करण्यात आली आहे. असे असतानाही मागील १० महिन्यांपासून त्यांना नियुक्ती मिळालेली नाही. तर दुसरीकडे राज्यसेवा उत्तीर्ण झालेल्या ६२३ उमेदवारांच्या निवडीचे प्रकरणचही प्रलंबित आहे.

त्यांच्याही न्यायालयीन प्रकरणांचा निवडा झाला असून नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. या दोन्ही परीक्षांच्या नियुक्तीसंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केल्यानंतर आज अखेर कृषी सेवा परीक्षेतील ४१७ उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहेत. आचारसंहितेपूर्वी नियुक्ती पत्र मिळाल्याने उमेदवारांनी दिलासा मिळाला असून त्यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले.

कृषी सेवेच्या याचिकेसंदभार्तील याचिका फेटाळल्यानंतर संबंधित निवड झालेल्या उमेदवारांनी कृषी विभागामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारणा केली असता न्यायालयीन निकाल आल्यानंतर नियुक्तीची उर्वरित प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान एक आठवडा तरी लागू शकतो, असे सांगण्यात आले. यानंतर उमेदवारांनी आंदोलन केले. तर कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचीही अनेकदा भेट घेतली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात मध्यस्थी करून नियुक्तीसाठी पूर्ण प्रयत्न केले आहेत. त्यामुळे त्यांच्या नियुक्त्या मार्गी लागणार आहेत. तसेच ६२३ उमेदवारांची अंतिम निवड यादीही लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती आहे.

कृषी विभागाच्या उमेदवारांना नियुक्ती मिळात विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण आहे. अनेक महिन्यांपासून त्यांनी यासाठी संघर्ष केला होता. न्यायालयाच्या निर्णयानंतरही नियुक्ती मिळत नसल्याने त्यांनी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनाही अनेकदा निवेदन दिले. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रत्यक्ष या प्रकरणात लक्ष दिले. त्यानंतर हा प्रश्न सुटल्याने विद्यार्थ्यांकडून विविध समाज माध्यमांवर धन्यवाद देवा भाऊचे संदेश व्हायरल केले जात आहेत.

## दीक्षाभूमीवर आंबेडकरी समाज एकवटला



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भारतीय इतिहासातील महत्त्वाचा दिवस आहे. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध धर्माच्या अनुयायांसाठी हा तो दिवस आहे जेव्हा 14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसह नागपुरातील दीक्षाभूमी येथे बौद्ध धमार्ची दीक्षा घेतली. हा कार्यक्रम भारताच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासातील एक महत्त्वाचा निर्णय होता. कारण याने जाति-आधारित भेदभावापासून मुक्त होण्याच्या दिशेने आणि बौद्ध धमार्चा गाभा असलेल्या समानता, न्याय आणि करुणा या तत्त्वांच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. 12 ऑक्टोंबर ला भारत देशातील आंबेडकरी अनुयायी दीक्षाभूमीवर आले होते. आज 14 ऑक्टोंबर रोजी आंबेडकरांनी दीक्षा घेतली होती त्याच पार्श्वभूमीवर विदभार्तील आंबेडकरी अनुयायी यांनी 14 ऑक्टोंबर 2024 रोजी दीक्षाभूमीवर येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध यांना अभिवादन केले.

यावेळी पत्रकारांनी आंबेडकरी अनुयायांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की धम्मचक्र प्रवर्तन दिन दरवर्षी लाखो लोक विशेषतः नागपुरातील 14 ऑक्टोंबर रोजी दीक्षाभूमी येथे मोठ्या उत्साहात साजरा करतात.

हा दिवस डॉ. आंबेडकरांच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी आणि भगवान बुद्धांचा संदेश - अहिंसा, करुणा आणि जातीभेदाला विरोध करण्यासाठी समर्पित असल्याचे सांगितले.

## भीमपुत्र भांगे यांच्या नेतृत्वात रहाटे कॉलनी मेट्रो स्थानक नामांतर आंदोलनाला उत्तुंग प्रतिसाद

### दीक्षाभूमी मेट्रो स्थानकाच्या फलकाचे उदघाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :
धम्म चक्र प्रवर्तन दिनाच्या शुभ मुहूर्तावर दक्षिण-पश्चिम नागपूर स्थित पवित्र दीक्षाभूमीवर रहाटे कॉलनी मेट्रो स्थानकाचे नाव "दीक्षाभूमी मेट्रो स्थानक" करण्याच्या मागणीसाठी जोरदार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व सामाजिक कार्यकर्ते आणि समतेचे खंदे समर्थक तसेच आगामी विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार भीमपुत्र विनय भांगे यांनी केले.

भीमपुत्र भांगे यांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनात अनेक भीमबांधव, भगिनी आणि अनुयायांनी सहभाग घेतला. दीक्षाभूमीपासून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आणि रहाटे कॉलनी मेट्रो स्थानक येथे पोहोचून स्थानकाच्या ठिकाणी दीक्षाभूमी मेट्रो स्थानक अश्या नामांतराचा फलक लावून दीक्षाभूमीवर भेट देण्यासाठी आलेल्या एका वयोवृद्ध जोडप्याच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. दीक्षाभूमीचे आंतरराष्ट्रीय महत्व अधोरेखित करून रहाटे कॉलनी चौक मेट्रो स्थानकाचे नामांतर "दीक्षाभूमी मेट्रो स्थानक" असे करण्याची मागणी या आंदोलनात करण्यात आली.

भीमपुत्र भांगे यांनी सांगितले की, दीक्षाभूमी हे केवळ ऐतिहासिक ठिकाण नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील बौद्ध धर्म स्वीकारण्याचे, समतेचे आणि बंधुत्वाचे प्रतीक आहे. त्यामुळे रहाटे कॉलनी मेट्रो




स्थानकाला दीक्षाभूमीचे नाव दिल्याने केवळ नागपूर किंवा देशभरातीलच नव्हे, तर जगभरातील अनुयायांना या पवित्र स्थळाला भेट देण्यासाठी थेट या मेट्रो स्टेशनपर्यंत प्रवास करणे अत्यंत सोयीचे होईल." यावेळी भीमपुत्र विनय भांगे यांनी मेट्रो स्थानकावर उपस्थित जन समुदायाचे आभार व्यक्त केले. यानंतर त्यांच्या निदेर्शानुसार १०० फूट धम्मध्वजासह पुन्हा दीक्षाभूमी येथे पोहोचून यात्रेचे समापन केले.

**नामांतराचे फायदे**

१. आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखः दीक्षाभूमी हे समतेचे जागतिक प्रतीक आहे. मेट्रो स्थानकाचे नामांतर केल्यास या ठिकाणाची ओळख जगभरातील पर्यटकांना मिळेल.

२. सुविधाः नागपूरात येणाऱ्या अनुयायांसाठी आणि पर्यटकांसाठी सोईचे असेल की, मेट्रो स्थानक थेट दीक्षाभूमीशी जोडले जाईल.

३. सन्मानः हा नामांतर केवळ प्रशासनिक बदल नसून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या कायार्चा सन्मान आहे.

या आंदोलनाला उत्तम प्रतिसाद मिळाला आणि या नामांतराच्या मागणीचे अनेक भीमबांधव आणि भगिनींनी जोरदार समर्थन केले. आंदोलनस्थळी भीमपुत्र विनय भांगे, प्रदेश सदस्य वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र राज्य यांच्या समवेत मा. संजय सूर्यवंशी, अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी दक्षिण पश्चिम नागपूर, मा. विनोद भांगे, सामाजिक कार्यकर्ता, मा. विवेक माताडी, जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन माताडी, अतुल शेंडे, किशोर धोटे, विनोद मोहोड, विशाल वाहिले, हरिदास गवई, रोहित राऊत, रेखा वाघमारे, प्रतीक वंजारी, मयंक भांगे चेतन चंद्रकर, शिव विश्वकर्मा, मयूर गजघाटे, रोहित शिंगाडे, आर्यन मेश्राम, कृणाल धोटे, पुरुराज बत्रा, प्रशिल श्रृंगारे व अन्य सदस्य, पदाधिकारी आणि भीम बांधव यांचा समावेश होता. या आंदोलनाने नागपूरच्या इतिहासात एक नवे पर्व जोडले गेले आहे. आता रहाटे मेट्रो स्थानकाच्या अधिकृत नामांतरासाठी प्रशासनातर्फे लवकरच ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा सर्व भीम बांधवानी व्यक्त केली आहे.

## गावात सामाजिक एकोपा जोपासणे गरजेचे : रमेशचंद्र बंग

### महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्देश मंडळाद्वारे विजयादशमी उत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १४ :
सर्वधर्मसमभाव जोपासून प्रत्येक माणसाला मान सन्मानाची वागणूक देऊन प्रत्येकाच्या कामात पडणे हीच खरी माणुसकी असून गावागावात सामाजिक एकोपा जोपासल्यानेच गावाच्या सर्वांगीण प्रगतीचे मार्ग मोकळे होतात असे महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्देशीय मंडळ रायपूर हिंगणा यांच्या वतीने आयोजित विजयादशमी उत्सवात अध्यक्ष स्थानावरून बोलताना राज्याचे माजी मंत्री रमेशचंद्र बंग बोलत होते.

महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्देशीय मंडळ माळीपुरा रायपूर यांच्यावतीने मागील 58 वषार्पासून रायपूर येथील दसरा उत्सव मैदानावर विजयादशमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. तीच परंपरा कायम ठेवत यावर्षी सुद्धा दसरा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी सामाजिक कार्य करणारे प्रमोद बंग, अशोक कुंभरे यांना त्यांच्या सामाजिक कायार्चा



गौरव करून त्यांना शाल स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले तर माळी समाजात समाजाकरिता योगदान देणारे माळी महासंघाचे नागपूर (ग्रा) जिल्ह्याचे अध्यक्ष बाळकृष्ण येनकर यांना यावषीर्चा समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आला.

कार्यक्रमाला रायपूर जिल्हा परिषद सर्कलचे सदस्य दिनेश बंग, पंचायत समिती सदस्य सुनील बोंदाडे, अनिल चानपूरकर, जगदीश कनेर, उपसरपंच शिराज शेटे,जावेद महाजन, शशिकांत थोटे, मंडळाचे अध्यक्ष मुकेश कथलकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रभू रामचंद्रांची झाकी गावात भ्रमण करून आल्यानंतर विजयादशमीच्या मुख्य सोहळा साजरा करण्यात आला या सोहळ्यात श्रीरामाच्या भूमिकेत सात्विक मेडजोगे, लक्ष्मणाच्या भूमिकेत स्वराज मेडजोगे, माता शितेच्या च्या भूमिकेत स्वाती भोयर तर श्री हनुमानाच्या भूमिकेत स्वरूप पाचपोर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशन बनकर यांनी केले तर आभार समीर मेडजोगे यांनी मानले

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता मनीष उमाळे, शंकर जांबुतकर, सचिन कथलकर, प्रकाश वानखेडे, देवेन उपवंशी, योगेश कथलकर, निलेश पाटील, प्रसन्न वानखेडे, तेजस चंदनखेडे, पलाश उमाळे, दीप जांभुतकर, अमोल कथलकर, अनिकेत उमाळे, अनिकेत चंदनकडे, ध्रुव कथलकर , आकाश कथलकर, साहिल उमाळे, हर्षल कथलकर, प्रज्वल खडतकर, अविनाश उमाळे यांनी परिश्रम घेतले.